



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा






रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, गुरुवार दि. ०४.०७.२०२४ | अंक नं. १०६ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020





# पिण्याच्या पाईपलाईनमधून येते ड्रेनेजचे दुर्गंधीयुक्त पाणी

## प्रश्न तातडीने मार्गी लावा अन्यथा दुर्गंधीयुक्त पाणी महानगरपालिका आयुक्तांना पाजणार : नागरिकांनी दिला इशारा

नगर – नगर शहरातील विविध परिसरामध्ये पिण्याच्या पाईपलाईनमध्ये ड्रेनेजचे दुर्गंधीयुक्त पाणी मिक्स होत आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या प्रकारामुळे ज्येष्ठ नागरिक संतापले असून, त्यांनी सदरची तक्रार माजी नगरसेवक दत्ता जाधव यांच्याकडे केली. मैलामिश्रित पाण्याच्या बाटल्या हातात घेऊन निषेध नोंदवला व लवकर प्रभाग क्रमांक १५ मध्ये स्वच्छ पाणी सोडण्यासाठी मनपाने तातडीने उपाययोजना कराव्यात. ज्या भागातून पाणीपुरवठा केला जातो, त्या टाक्या देखील स्वच्छ कराव्यात, असे न झाल्यास मनपा आयुक्तांना हेच मलमिश्रित पाणी पाजू असा इशारा शिवसेना समन्वयक दत्ता जाधव यांनी दिला आहे.



प्रभाग १५ मधील आगरकर मळा परिसरातील नागरिकांना मैलामिश्रित पाणी येत असल्याने नगरसेवक दत्ता जाधव यांनी याबाबत मनपाच्या विरोधात आंदोलनाचा इशारा दिला.

यावेळी नगरसेवक प्रशांत गायकवाड, युवराज खैरे, सचिन बनकर, ज्ञानेश्वर कविटकर, अशोक आगरकर, नूरआलम शेख, के. डी. खानदेशी, विजय लुणे, श्रीकृष्ण लांडगे, श्री.पत्रे सर, बाबुराव उगले, श्रीधर नांगरे, विठ्ठल मुळे आदिंसह नागरिक उपस्थित होते.

याप्रसंगी दत्ता जाधव म्हणाले, गेल्या अनेक महिन्यांपासून आगरकर मळा येथील प्रभाग क्र. १५ मध्ये पिण्याच्या पाण्याचे व्यवस्थापन पुर्णपणे बिघडले असून, त्याचा नागरिकांना मोठा त्रास होत आहे. पिण्याच्या पाण्याची अनियमितता, काही भागात पूर्णदाबाने पाणी येत नाही. तसेच मैला मिश्रित पाणी अशा समस्यांचा सामना करावा लागत आहे. सध्याही ड्रेनेज लाईन व पिण्याची पाईपलाईन काही ठिकाणी फुटलेली असल्याने दोन्ही पाणी मिक्स होऊन पिण्याचे पाणी ड्रेनेजयुक्त येत आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. याबाबत वेळावेळी प्रशासनास निवेदने देण्यात येतात, परंतु त्यावर काहीही उपाययोजना केल्या जात नाही. दोनच दिवसापुर्वी गाझीनगर परिसरातील महिलांनी पाणी प्रश्नाबाबत मनपा आयुक्तांची भेट घेऊन त्यांच्यापुढे समस्या मांडल्या परंतु त्याबाबतही काही झाले नाही. तेव्हा यावर तातडीने उपाययोजना कराव्यात, अन्यथा हेच मैलामिश्रीत पाणी आयुक्त यांना पाजण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.


## सुप्रसिद्ध अंकशास्त्रज्ञ श्वेता जुमानी ६ ते ७ जुलैदरम्यान अहमदनगरमध्ये

अंकशास्त्रातील भरीव योगदानासाठी 'लिजंड ऑफ इंडिया' आणि सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित अंकशास्त्रतज्ज्ञ श्वेता जुमानी आपल्या भेटीसाठी अहमदनगरमध्ये येत आहेत.

लोकसभेच्या निवडणुका नुकत्याच झाल्या आणि गाजल्या. यावेळी 'एक्झिट पोल' सपशेल फसलं; पण नेहमीप्रमाणे 'अंकशास्त्र' मात्र अचूक ठरलं. विख्यात अंकशास्त्रतज्ज्ञ जुमानी यांनी सांगितलं होतं की, नरेंद्र मोदींसाठी ही निवडणूक अत्यंत आव्हानात्मक ठरेल आणि राहुल गांधींसाठी फायद्याची असेल. झालंही अगदी तसंच. नावाचं स्पेलिंग, जन्मांक आणि निवडणुकीच्या तारखांचे अंक यांवरुन हा अंदाज बांधला गेला.

'नावात काय आहे?' असं म्हटलं जातं; पण अंकशास्त्रामध्ये मात्र नावाला महत्त्व आहे; कारण आपलं नाव हे आपल्या व्यक्तिमत्त्वाचाच एक भाग असतं. अंकशास्त्रानुसार शुभांकावर आणलेलं नाव व्यक्तिमत्त्वाला सामर्थ्य देतं आणि यशाचा मार्ग सुगम करतं. केवळ नावाच्या स्पेलिंगमध्ये योग्य तो बदल करून अनेक समस्या सोडवता येऊ शकतात.

कौटुंबिक, व्यावसायिक समस्या, आरोग्याच्या तक्रारी, करिअरचा ताणतणाव, नातेसंबंधांमधली गुंतागुंत तसेच ज्यांना अपत्य होत नाहीत त्यांनाही यांच्या सल्ल्याने संतती प्राप्ती झालेली आहे. या व अशा अनेक समस्यांसाठी अंकशास्त्राची मदत होते. व्यक्तीच्या नावाप्रमाणेच दुकानं, कारखाने, संस्था, प्रोजेक्ट, चित्रपट, टी.व्ही. मालिका अशा सर्व नावांचा विचार इथे केला जातो.



एकता कपूर, रोहीत शेट्टी, उस्ताद अमजद अली खान, इम्रान हाश्मी, सोनाक्षी सिन्हा, अनिल कपूर, तुषार कपूर, हिमेश रेशमिया, अनुराधा पौडवाल, निर्मिती सावंत, राहुल द्रविड, अनिल कुंबळे, वीरेंद्र सेहवाग, श्रीशांत, एम. एस. धोनी अशा चित्रपट-क्रिकेट-उद्योग क्षेत्रांतील अनेक दिग्गजांनी जुमानींचा अंकशास्त्राचा सल्ला मानला. शाहरुख खाननंही त्याच्या 'के. के. आर.' क्रिकेट टीमसाठी अंकशास्त्राची मदत घेतली होती.

व्यक्तीच्या नावाचा विचार करताना केवळ त्या व्यक्तीपुरताच विचार केला जातो; पण एखाद्या कंपनीचं, संस्थेचं किंवा चित्रपट, टी.व्ही. सीरिअलचं नाव ठरविताना समूहाचा विचार करावा लागतो; कारण तिथे अनेक लोक मिळून काम करत असतात. तेव्हा ते नाव सर्व जन्मांकांसाठी योग्य अंकावर आणलं जातं.

काही जन्मांक व्यावहारिक दृष्टीनं लाभदायक असतात, तर काही नसतात. जन्मांक बदलणं काही शक्य नसतं; पण शुभनामाची साथ मिळवणं सहज शक्य असतं. त्यामुळे शुभांकावरचं नाव सगळ्यांसाठीच आवश्यक असतं; पण जन्मांक लाभदायक नसेल तर मात्र ते अत्यावश्यक असतं.

यशस्वी जीवनासाठी अंकशास्त्रानुसार अशा अनेक सोप्या टिप्स श्वेताजी आपल्याला देतात. यशासाठी मेहनत आवश्यक असतेच; पण अंकशास्त्रामुळे मेहनतीला भाग्याची साथ लाभते.

Advt.

व्यक्तिगत सल्ल्याकरिता संपर्कासाठी
फोन : 9765322314, 9834885132
www.jumaani.com


# पूर्ण क्षमतेने पाणी सोडावे अन्यथा आंदोलन करणार

नगर – नगर कल्याण रोड वरील गणेशनगर वसाहतीत जवळपास २००० नागरीक राहत आहे. गेली सहा महिन्यापासून गणेशनगर मध्ये पुर्ण दाबाने नळाने पाणी येत नाही.त्यामुळे गणेशनगर येथील नागरिकांचा पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. गणेशनगर येथे अंतर्गत पाईपलाईन टाकून जवळपास सहा वर्ष झाले आहे. पाईपलाईनचे तोंड काही ठिकाणी उघडेच असल्यामुळे यामध्ये दगड, गोटे व माती गेली असल्याकारणाने गणेशनगर मध्ये पाणी कमी दाबाने येत आहे. ही पाईपलाईन ठेकेदाराने पाणी सोडण्यापुर्वी चागल्या प्रकारे वॉश आऊट केली नसल्याकारणाने ही पाईपलाईन काही ठिकाणी लिक झाली आहे.



नगर कल्याण रोड वरील गणेशनगर वसाहतीत पूर्ण क्षमतेने पाणी सोडावे या मागणीचे निवेदन उपायुक्त विजयकुमार मुंडे यांना देताना गणेश शिंदे आदी.

कल्याण रोड गणेशनगर येथील पाईपलाईन वॉश आउट करून लिकेज काढण्याबाबत महानगरपालिकेचे उपायुक्त विजयकुमार मुंडे यांना नागरिकांच्या वतीने निवेदन देण्यात आले. याप्रसंगी गणेशनगरचे चेअरमन गणेश शिंदे, अनिल राऊत, गणेश मंचिकटला, नानासाहेब देवतरसे, उमेश गोरे, पोपट शेळके, विकी सुपेकर उपस्थित होते.

काही विकाणी ४ इंची पाईपलाईन टाकणे बाकी आहे. आम्ही वॉलमन व संबंधीत अधिकारी यांना वारंवार तोंडी सांगून काही एक उपयोग झाला नाही. गणेशनगर मधील नागरीक १००% कर भरत आहे. येथे कोणाचीही थकबाकी नाही. त्यामुळे आम्हां नागरीकांना पुर्ण दाबाने पाणी मिळाले नाही. तर आंदोलन करण्याशिवाय पर्याय नाही. जातीने लक्ष घालून पाणीपुरवठा सुरळीत करावा. अशी मागणी गणेशनगर येथील नागरिकांच्या वतीने करण्यात आली आहे.















जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## 'आज' हा 'त्याचा' आपल्याला उपहार आहे

महात्मा महात्रयारा यांचे 'न पाठवलेलं पत्र' या पुस्तकातून अनेक प्रेरणादायी शब्दगुच्छांचा संग्रह आपल्या हाती लागतो. एकदा हे पुस्तक वाचून तर बघा. ते म्हणतात, 'उपहार (भेट) ही केवळ पदार्थमय नसतो तर तो असतो एक दृष्टिकोन - पदार्थाच्या पलिकडच्या अंतःकरणाकडे पाहण्याचा. त्या अर्थानं 'आज' हा एक शाश्वत उपहार आहे. प्रत्येक उपहाराचे अनेक उगमस्त्रोत असू शकतात.

'आज' हा मात्र एक असा मौल्यवान उपहार आहे जो तुम्हाला 'त्याच्याकडूनच' मिळतो. काल रात्री झोपी गेलेली प्रत्येक व्यक्ती काही आज सकाळी जागी झाली नाही, तुम्ही जागं झालात याचा अर्थ कोणत्या तरी शक्तीला

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन

संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१

तुम्ही आणखी एका 'आज'साठी पात्र आहात असं वाटत आहे. या २४ तासांच्या 'वस्तू' मागचं दैवी अंतःकरण ओळखा. समजून घ्या की 'आज' हा एक दैवी उपहार आहे.



तुमचा हा 'आजचा' दिवस वाया घालवणं म्हणजे 'त्याची' एक अवहेलना आहे. या उपहाराचा मूल्य जाणून घेतलं तरच तुम्ही त्याची कदर कराल. 'आज'चं मोल जाणून घ्या आणि त्या 'आज'सह आयुष्याचेही सार्थक (मौल्यवान) करा.

# भाजपने डॉ. सुजय विखे पाटील यांना नगर शहर विधानसभेची उमेदवारी द्यावी

नगर - विधानसभा निवडणुकीचे पडघम वाजू लागले. 'ये रे माझ्या मागल्या' प्रमाणे संभ्रम सुरु झाले. अनुभवाने शहाणपण येते असे म्हणतात. पण अनुभवातून धडा शिकले तरच! स्वबळाचा नारा देणारे निष्ठावंत थकले. आपल्या मतदार संघात आपला उमेदवार मिळेल याकडे डोळे लावून बसले. परंतु निष्ठावंतांच्या मागणीला पक्षातूनच बळ मिळेनासे झाले.

आता शिरस्थ नेतृत्वाने सखोल अभ्यास करण्याची गरज आहे. युतीच्या भानगडीने संख्या बळाचा आकडा २३ वरुन ९ आला याचाच अर्थ निवडून आलेल्या उमेदवारापेक्षा पराभूत दुप्पट झाले हेच युतीचं फलित! मागील विधानसभेत १२३ वरुन १०५ वर संख्या आली, ही घसरण कशामुळे झाली? घडामोडी, पाडापाडी, तडजोडी हा युतीचा मुलभूत पाया आहे. त्यात आपण अडकलो तर नाहीना याचा विचार झाला पाहिजे. या घडामोडीत आपण एक नंबरचा पक्ष आहे, हे लक्षात ठेवले पाहिजे. इतरांनी दिलेला अति आत्मविश्वासाचा इशारा लक्षात घेणे आवश्यक आहे. म्हणूनच निष्ठावंतांनी एकजूट करुन एकीचे बळ दाखविले पाहिजे. वस्तुतः घटक पक्षाशी अनावश्यक तडजोडी करण्याची गरज नव्हती. त्या तडजोडीतून पडझडच जास्त झाली. अनावश्यक व धोकादायक घटकपक्ष दूर केले पाहिजेत. निवडणूक निकालानंतर त्यावर चर्वितचर्वण करणे योग्य नाही. 'गतस्य शोचनम् नास्ति।' झालेल्या गोष्टीचा शोक करणे व्यर्थ आहे. तेव्हा घटक पक्षातून सावध होऊन आपला स्वबळाचा संसार थाटणे अधिक शहाणपणाचे ठरेल. पक्षश्रेष्ठींनी सामान्य कार्यकर्त्याचा आवाज दाबणे योग्य नाही. अन्यथा विधानसभेला इतिहासाची पुनरावृत्ती होईल, असा इशारा भाजपचे शहर जिल्हा उपाध्यक्ष अनिल गट्टाणी यांनी दिला आहे.



अहमदनगर शहराचा विचार केला असता विधानसभेसाठी अत्यंत दयनीय परिस्थिती आहे. स्वातंत्र्योत्तर कालापासून आजपर्यंत शहराला भाजपला आमदार मिळाला नाही, हे दुर्दैव आहे. भयमुक्त नगर या गोंडस घोषणेखाली गेली २५-३० वर्षे दुसऱ्याचीच पालखी उचलली त्यामुळे शहर उमेदवारीसाठी पक्षातीलच पदाधिकारी बाहेरचा उमेदवार सुचवू लागले. स्वपक्षात सक्षम उमेदवार तयार करण्यास पक्षाला सपशेल अपयश आले.

याचे मुख्य कारण 'टिफिन पार्टी' सारखे प्रयोग होय. बूथ कार्यकर्त्यांशी पार्टी ऐवजी प्रत्यक्ष संवाद साधणे वरुन निर्णय न लादता कार्यकर्त्याचे प्रत्यक्ष भेटून मत जाणून घेणे महत्त्वाचे असते. सुरुवातीला पहिले सरकार कोसळल्यानंतर मुख्यमंत्री भाजपचाच व्हायला पाहिजे होता. निवडणुकीच्या काळात मुख्यमंत्रीपद असलेल्या पक्षाला जनता झुकते माप देते, ते सिध्द झालेले आहे. स्वतःला रणनीतीकार समजणाऱ्या लोकांनी आखलेली रणनिती अखेर भ्रमनिती ठरली. त्याचा संख्याबळावर परिणाम झाला. पक्षविस्तारासाठी ती काळाची गरज आहे. सत्तेपेक्षा संख्या बळावर लक्ष देणे अधिक महत्त्वाचे आहे.

आता निदान शहरातील भय, दहशतवाद यांचे उच्चाटन करायचे असेल तर आपल्या पक्षाचाच उमेदवार निवडून आला पाहिजे. तोही धरसोड करणारा नसावा. सध्या लोकसभेत पराभूत झालेल्या व्यक्तींना विधानसभेवर संधी दिली जाते, तशी संधी नगर लोकसभा उमेदवारास डॉ. सुजय विखे पाटील दिली पाहिजे. शहरातून त्यांना मोठा लीड मिळालेला आहे. नगर विकासासाठी हा प्रयोग युतीची सर्व बंधने तोडून करुन पाहण्यास काही हरकत नाही. शेवटी युती महत्त्वाची नसते, संख्याबळ महत्त्वाचे असते. मुख्यमंत्रीपद महत्त्वाचे असते. काही हटवादी युती समर्थकांच्या नादी लागल्यास हाती धुपाटणे येण्याची शक्यता आहे, असे भाकित अनिल गट्टाणी यांनी केले आहे.

# राहुरी व नगरमध्ये 'प्रभावी भाषण शिका'चा फ्री सेमिनारचे आयोजन

नगर - स्टेजची भीती पूर्णतः जावी, प्रचंड आत्मविश्वास वाढावा, व्यक्तिमत्त्व विकास घडावा, भाषणाचा भरपूर सराव व्हावा आणि भाषण कला सर्वांसाठी खूप सोपी व्हावी, यासाठी विवेकानंद ॲकॅडमीच्यावतीने नगर शहरात मागील १४ वर्षांपासून वर्कशॉप घेतले जातात. खात्रीशीर प्रॅक्टीकल सेमिनार ६ जुलै रोजी दुपारी १२ ते ४ या वेळेत राहुरीतील श्री संत गाडगेबाबा ज्येष्ठ नागरिक संघ ट्रेनिंग हॉल, गोकुळ कॉलनी येथे व ७ जुलै रोजी दुपारी १२ ते ४ या वेळेत नगरमधील नागापूर येथील एमसीसीआयए ट्रेनिंग हॉल, सह्याद्री चौक, पोस्ट ऑफिस शेजारी होईल.

तुम्ही खात्रीशीरपणे भाषण शिकण्याची कला ॲकॅडमीच्या माध्यमातून अवगत करू शकता, असे संचालक ज्ञानेश्वर कवडे यांनी सांगितले. अधिक माहितीसाठी ७०३०४५१३३३ या मोबाईलवर संपर्क साधावा.

आतापर्यंत कवडे सरांनी अनेक वक्ते घडविले असून, अनेकजण विविध क्षेत्रात नावलौकिक मिळवत आहेत. ते उत्तमप्रकारे भाषण करून मंच गाजवत आहेत. हे सेमिनार मोफत असून, यामध्ये सर्व वयोगटातील महिला व पुरुषांना सहभागी होता येईल. ज्यांना भाषण शिकण्याची कला अवगत करायची आहे. त्यांनी या फ्री सेमिनारमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन ॲकॅडमीच्या वतीने करण्यात आले आहे.

### पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली

# जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीचे ६ जुलैला आयोजन

नगर - राज्याचे महसुल, पशुसंवर्धन व दुग्धविकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ६ जुलै रोजी सकाळी १०-३० वाजता जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीचे दूरदृष्यप्रणालीद्वारे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा नियोजन अधिकारी दीपक दातीर यांनी दिली आहे.

बैठकीमध्ये ८ जानेवारी २०२४ रोजी झालेल्या जिल्हा नियोजन समिती बैठकीचे इतिवृत्त व अनुपालन अहवालास मान्यता, जिल्हा वार्षिक योजना सन २०२३-२४ (सर्वसाधारण, आदिवासी उपयोजना, अनु. जाती उपयोजना) मार्च, २०२४ अखेर खर्चास मान्यता, सन २०२४-२५ (सर्वसाधारण, आदिवासी उपयोजना, अनु. जाती उपयोजना) जुन, २०२४ अखेरच्या खर्चाचा आढावाही या बैठकीत घेण्यात येणार असल्याचेही कळविण्यात आले आहे.

# त्र्यंबकेश्वर दिंडीच्या महाराजांना मागितली १ लाखाची खंडणी

नगर - त्र्यंबकेश्वर (नाशिक) येथील श्री संत निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळा समितीचे सदस्य पुंडलीक महाराज थेटे (रा. गिरणारी, जि. नाशिक) यांना एका अनोळखी व्यक्तीने फोन करून एक लाख रूपये खंडणीची मागणी करून जिवे मारण्याची धमकी दिली. 'तुम्हाला आमचे राज ठाकरे साहेबांची ॲलर्जी आहे काय, तुम्हाला नगरमधील मनसेचे कार्यकर्ते काळे फासतील' असा दमही त्या व्यक्तीने दिला आहे.

मंगळवारी दुपारी दिंडी शेंडी (ता. नगर) येथील दत्त मंदिरात आली असता सदरची घटना घडली असून या प्रकरणी थेटे महाराज यांनी बुधवारी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी एका मोबाईल नंबर धारक अनोळखी व्यक्तीविरूध्द धमकी, खंडणीच्या कलमानुसार गुन्हा दाखल केला असून तो तपासकामी एमआयडीसी पोलिसांकडे वर्ग केला आहे. त्र्यंबकेश्वर येथून २० जून रोजी दिंडीचे पंढरपुरकडे प्रस्थान झाले आहे. या दिंडीत थेटे महाराज सहभागी झाले आहे. दिंडी मंगळवारी (२ जुलै) दुपारी नगर - छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील शेंडी येथील दत्त मंदिरात थांबली होती. त्यावेळी थेटे महाराज यांच्या मोबाईलवर एका अनोळखी मोबाईल नंबरवरून मिसकॉल आला. त्यानंतर पुन्हा त्याच नंबरवरून त्यांना फोन आला असता त्यांनी तो उचलला. तेव्हा समोरचा व्यक्ती म्हणाला,'तुम्हाला आमचे राज ठाकरे साहेबांची ॲलर्जी आहे काय, तुम्ही सध्या कोठे आहात, तुमचे लोकेश कोठे आहे. तुमच्या तोंडाला अहमदनगर मधील मनसेचे कार्यकर्ते काळे फासतील' असा दम दिला. तसेच 'तुला हे संकट टाळायचे असेल तर मला एक लाख रूपये दे नाहीतर तुला जिवे मारून टाकीन' अशी धमकी दिली. दरम्यान त्याच व्यक्तीने पुन्हा फोन करून जिवे मारण्याची धमकी दिली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

दिंडी नगर शहरात आल्यानंतर थेटे महाराज यांनी बुधवारी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेतला असून एमआयडीसी हद्दीत गुन्हा घडला असल्याने तो तपासकामी एमआयडीसी पोलिसांकडे वर्ग करण्यात आला आहे.

एमआयडीसी पोलीस अधिक तपास करत आहेत.

# शहरासह जिल्ह्यातील अवैध धंदे बंद करा अन्यथा १० जुलै रोजी पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर 'प्रतिकात्मक स्टॉल' लावणार

नगर - मोठ्या प्रमाणात वाढलेले अवैध धंदे त्वरीत बंद करावे, अवैध धंद्यांना अभय देणाऱ्या पोलीस निरीक्षकांची बदली करुन सक्षम अधिकारी नेमण्याची मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) महिला आघाडीच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. अवैध धंद्यांवर कारवाई न झाल्यास १० जुलै रोजी पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर सर्व अवैध धंद्यांचे प्रतिकात्मक स्टॉल लाऊन आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.



अवैध धंदे त्वरीत बंद करा अन्यथा १० जुलै रोजी पोलीस कार्यालयासमोर अवैध धंद्यांचे प्रतिकात्मक स्टॉल लावण्याचा इशारा आरपीआय (गवई) महिला आघाडीच्यावतीन देण्यात आला आहे.

यांच्या पथकाने कारवाई केली असता, त्या ठिकाणी सुमारे एक कोटी रुपयांचा गुटखा ताब्यात घेण्यात आला. तरी देखील पोलीस निरीक्षक या प्रकरणाकडे लक्ष देत नाही. पोलिसांच्या आशीर्वादाने हा प्रकार सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

सर्वात जास्त गांजा विक्री एमआयडीसी हद्दीत होताना दिसून येत आहे. अनेक युवक गांजाच्या नशाला बळी पडत असून, नशेमध्ये असलेल्या युवकांकडून अनेक गंभीर गुन्हे घडत आहेत.

याप्रसंगी महिला आघाडीच्या शहर जिल्हाध्यक्ष ज्योती पवार, जयश्री गायकवाड, मीना काळे, त्रिवेणी देवणे, सविता काळे, विमल लाळगे, मीराबाई आरु, अनिता भोसले, बाबासाहेब आरु आदी महिला उपस्थित होत्या.

एमआयडीसी पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये गांजा, हातभट्टी, मटका, जुगार, बिंगो व गुन्हेगारी जोमाने सुरू आहे. असे असताना देखील पोलीस निरीक्षक झोपेचे सोंग घेत आहे. या पोलीस स्टेशनच्या हद्दीत अवैध धंद्याबरोबरच गुन्हेगारी देखील मोठ्या प्रमाणात वाढली आहे. खून, दरोडा, लुटमार, चोरी यांसारखे गंभीर गुन्हे सातत्याने घडत आहेत. पोलीस प्रशासनाच्या नाकावर टिच्चून पांढरीपुल येथे एका हॉटेलच्या मागे गुटखा विक्री खुलेआम सुरू आहे. या गुटख्याच्या धंद्यावर नाशिक येथील डीआयजी

त्यामध्ये अनेक अल्पवयीन मुलांचा देखील समावेश आहे. गांजाच्या नशेमुळे त्यांचे भवितव्य अंधकारमय बनले आहे. काहींचे संसार उध्वस्त झाले आहे. हातभट्टी पिऊन अनेक युवक मृत्युमुखी पडत आहेत. सोरट, बिंगो जुगार, मटका यामुळे रोजंदारीवर कमावलेले पैसे युवक गमावत आहे. त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ येऊन ठेपली आहे. सर्वच कुटुंब हतबल झाले असून, त्यांच्यावर कर्जाचे डोंगर झाले आहे. अनेकांवर आत्महत्या करण्याची वेळ आली असल्याचे निवेदनात म्हंटले आहे.

सदर भागात न घाबरता दिवसाढवळ्या खुलेआम अवैध धंदे सुरू आहे. एमआयडीसी हद्दीतील सर्वच अवैध धंदे बंद होत नसतील, तर पोलीस निरीक्षक हे अकार्यक्षम असल्याचे जाहीर करून त्यांची बदली करून त्या ठिकाणी कर्तव्यदक्ष अधिकारी नेमण्याची मागणी रिपाई महिला आघाडीच्या वतीने करण्यात आली आहे.



भाजपतर्फे लाडकी बहीण योजनेविषयी महिला व नागरिकांना माहिती देताना माजी महापौर बाबासाहेब वाकळे. (छाया - लहू दळवी)

## महिलांनी लाडकी बहीण योजनेचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा

**बाबासाहेब वाकळे यांचे आवाहन; लाडकी बहीण योजनेसाठी भाजपच्या वतीने नागरिकांमध्ये जनजागृती**

नगर - भाजपचे केंद्र व राज्य सरकार नागरिकांसाठी विविध योजना सुरू करत असून त्या योजनेचा लाभ थेट नागरिकां पर्यंत पोहोचावा यासाठी भाजपच्या कार्यकर्त्यांनी समाजामध्ये जनजागृती करावी राज्य सरकारने लाडकी बहीण योजनेचा शुभारंभ केला. असून ऑनलाइन फॉर्म भरण्यासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची जुळवाजुळव करण्यासाठी महिला मोठ्या संख्येने. तलाठी कार्यालय येथे गर्दी करत आहे.

मात्र पिवळे व केसरी कुपन धारकाला उत्पादन दाखलेची गरज नाही. तसेच रहिवाशी दाखला देखील मतदार ओळखपत्र, जन्म दाखला, शाळा सोडलेला दाखला आणि पंधरा वर्षांपूर्वी कुपन या चार पैकी कुठलाही एक पुरावा चालणार आहे.

याच बरोबर वयोमर्यादा देखील वाढवण्यात आले असून २१ ते ६५ करण्यात आली आहे. तरी भाजपच्या कार्यकर्त्यांनी नागरिकांमध्ये जाऊन लाडकी बहीण योजनेबाबत जनजागृती करावी व शेवटच्या घटकापर्यंत शासनाच्या योजना घेऊन जाव्यात अशी माहिती माजी महापौर बाबासाहेब वाकळे यांनी दिली.

# चोर समजून झालेल्या मारहाणीत एकाचा मृत्यू

### पांगरमल येथील घटना; गुन्हा दाखल

नगर - पांगरमल (ता. जि. अ.नगर) येथे ४ जुलै रोजी पहाटेच्या सुमारास गावात आलेल्या पारधी समाजाच्या लोकांना चोर समजून गावातील लोकांनी चांगदेव नामदेव चव्हाण (रा. गंगापूर, ता.जि.औरंगाबाद), सादिक चव्हाण, प्रवीण भोसले, रामलाल भोसले (रा. पांगरमल तालुका, जि. अ. नगर) असे चौघा जणांना जबर मारहाण केली असून त्यामध्ये चांगदेव चव्हाण हा मयत झाला असून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू आहे.

## रस्ते अपघातात वृद्धाचा मृत्यू

नगर - रस्ता अपघातात एका वृध्दाचा मृत्यू झाला. रवींद्र भगवान गायकवाड (वय ६० रा. काटवन खंडोबा) असे मयत वृध्दाचे नाव आहे. कायनेटीक चौक, हायवे टी सेंटर जवळ हा अपघात झाला असून या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. रवींद्र भगवान गायकवाड हे कायनेटीक चौक, हायवे टी सेंटर समोर नगरकडून पुण्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर अपघातात जखमी झाल्याने त्यांना खासगी रूग्णवाहिकेतून उपचारासाठी जिल्हा शासकीय रूग्णालयात मंगळवारी (२ जुलै) सकाळी दाखल केले असता त्यांचा मृत्यू झाल्याचे तेथील डॉक्टरांनी घोषीत केले. तशी माहिती डॉ. बटुळे यांनी कोतवाली पोलिसांना दिली. पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली असून अधिक तपास पोलीस अंमलदार गाडीलकर करत आहेत.

# 'माझी लाडकी बहीण' योजनेसाठी अडवणूक, दिरंगाई, पैशांची मागणी केल्यास कठोर कारवाई

**योजनेच्या पारदर्शक, गतिमान अंमलबजावणीसाठी नोडल अधिकारी, जिल्हाधिकाऱ्यांनी संपूर्ण प्रक्रियेवर लक्ष ठेवावे : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचना**

मुंबई - 'मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण' योजनेसाठी आवश्यक प्रमाणपत्रे देणे, अर्ज भरुन घेणे यासह या संपूर्ण प्रक्रियेत महिलांची अडवणूक केल्यास, प्रक्रियेत दिरंगाई केल्यास किंवा योजनेच्या लाभासाठी महिलांकडून पैशांची मागणी करीत असल्याचे निदर्शनास आल्यास अशा अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशा सक्त सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या आहेत. त्याचबरोबर ही संपूर्ण प्रक्रिया पारदर्शकपणे आणि जलदगतीने होईल यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष ठेवावे, या योजनेचे संनियंत्रण करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी, असे निर्देशही मुख्यमंत्री शिंदे यांनी दिले आहेत.

त्याचबरोबर योजनेसंदर्भातील कागदपत्रे उपलब्ध करुन देणे किंवा फॉर्म भरुन देण्याचे निमित्त करुन निर्माण होणारे दलाल अजिबात खपवून घेतले जाणार नाहीत. एखाद्या कार्यालयात असा प्रकार निदर्शनास आल्यास संबंधित कार्यालय प्रमुखावर तसेच दलालांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे.

योजनेसाठी नावनोंदणी, अर्ज करणे आदी कामांसाठी होणारी गर्दी लक्षात घेऊन अर्ज करण्याची मुदत ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत वाढविण्यात आली आहे. योजनेच्या लाभासाठी पात्र महिलांना आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करुन देणे तसेच त्यानंतर योजनेचा फॉर्म भरणे इत्यादी संपूर्ण प्रक्रियेसंदर्भात काल विधानभवन येथे मुख्यमंत्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सविस्तर चर्चा करुन योजनेची अंमलबजावणी पारदर्शक आणि जलदगतीने होईल यासाठी सूचना देण्यात आल्या आहेत.

माता-भगिनींचे आयुष्य बदलवून टाकणाऱ्या विविध योजना राज्य शासनाने आणल्या आहेत. मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजनेचा शासन निर्णयही लगेचच काढण्यात आला. या योजनेतील पात्र महिलांना महिन्याला दीड हजार रुपये म्हणजे वर्षाला १८ हजार रुपये राज्य सरकार देणार आहे. यासाठी ४६ हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. ही योजना म्हणजे माता-भगिनींना माहेरचा आहेर आहे. नोंदणीसाठी रांगा लावण्याची गरज पडणार नाही, यादृष्टीने चोख नियोजन करावे, लाडक्या बहिणींची कोणत्याही कारणास्तव अडवणूक होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, अशा सक्त सूचना मुख्यमंत्री शिंदे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

# केडगाव ते पंढरपूर भैरवनाथ पायी दिंडी सोहळ्याचे ७ जुलै रोजी आयोजन

नगर - दरवर्षी आषाढी एकादशीनिमित्त केडगाव ते पंढरपूर पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. या पायी दिंडी सोहळ्यामध्ये केडगाव व पंचकुशीतील हजारो वारकरी व भावीक भक्त सहभागी होतात. याही वर्षी केडगाव येथून भैरवनाथ पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून ७ जुलै रोजी सकाळी साडेआठ वाजता केडगाव भैरवनाथ मंदिर येथून सचिन कोतकर व सौ. वैशाली कोतकर यांच्या हस्ते दिंडीच्या रथाचे पुजन करून प्रस्थान होणार आहे.

तरी केडगाव मधील व पंचक्रोशीतील सर्व वारकरी व भाविक भक्तांनी दिंडीमध्ये सहभागी व्हावे असे आवाहन दिंडीचे संस्थापक भानुदास कोतकर, मार्गदर्शक संदिप कोतकर व दिंडी चे अध्यक्ष रामदास महाराज क्षिरसागर यांनी केले.

दिंडीत सहभागी होण्यासाठी एकनाथ कोतकर-(९८२२२९३६६४), बाबासाहेब कोतकर-(८२७५७१२१६२), भीमराज सातपुते-(७५८८५१३९४७), बाळासाहेब शिंदे-(९६०४८२६७६१), केडगाव येथील भैरवनाथ मंदिरामध्ये संपर्क साधावा.

# गृहिणी

## आरोग्य

### शुगर घेताना हे ध्यानात घ्या

कोंडायुक्त गव्हाच्या पिठाची रोटी, मिसळलेली धान्ये आणि भुरे तांदूळ यांचा खाण्यात उपयोग करावा. थंड पेयपदार्थ जसे कोकाकोला इत्यादींचा उपयोग कमी करावा. मधून मधून काही दिवसांसाठी शुगरचा उपयोग बंद करावा.

साखरेऐवजी फळे, मेवे अथवा स्नॅक्सचा उपयोग करावा. दररोज वयानुसार तीस ते साठ मिनिटांपर्यंत व्यायाम करावा. याने शरीरामध्ये कोलेस्टेरॉल आणि एसिटेट वाढण्यापासून रोखले जाईल. पेस्ट्रिज, चॉकलेट यांसारखे पदार्थ कमी मात्रेत खावेत.

## पाककला

### शाही मशरूम

**साहित्य** – साधारण १५-१६ बटन मशरूम्स, ३ टोमॅटो किंवा दीड वाटी टोमॅटो प्युरे, ३ मध्यम कांदे, १ मोठा चमचा गरम मसाला, १ मोठा चमचा धने-जिरे पूड, १ चहाचा चमचा तिखट, १ चहाचा चमचा कसुरी मेथी, ६-७ काजूबिया, साधारण अर्धी वाटी सुके खोबरे, १ मोठा चमचा हेवी क्रिम, २ मोठे चमचे तेल, मीठ चवीनुसार, १ टी-स्पून चमचा साखर.

**कृति** – बटन मशरुम्स अर्धे करून घ्या. टोमॅटो व कांद्यांपैकी २ कांदे चौकोनी चिरून घ्या. १ कांदा उभा जरा जाडसर चिरा. सुके खोबरे जरा लालसर होईल इतपत कोरडेच भाजून घ्या. पळीभर तेलावर चौकोनी चिरलेला कांदा व टोमॅटो परतून घ्या. त्यात गरम मसाला, तिखट, धने-जिरे पूड घालून परता. कसूरी मेथी घाला आणि काजूचे तुकडे घाला व थोडे परता. या सर्व मिश्रणाची मिक्सरमधून पेस्ट करा. सिल्किश टेक्स्चर येईल. कढईत १ चमचा तेल गरम करा. त्यात उभा चिरलेला कांदा घाला व परता.

कांदा, टोमॅटोची पेस्ट घाला. थोडे पाणी घालून सरसरीत करून घ्या म्हणजे चांगली ग्रेव्ही होईल. त्याला एक उकळी आणा. आता चिरलेला मशरुम्स घाला व शिजू द्या. खूप शिजवू नका. मशरुम्स मेण होता कामा नये. हेवी क्रिम घाला. मीठ व साखर घाला. कोथिंबिरीने सजवा. शाही मशरुम मसाला तयार आहे. नान/पराठा/रोटीबरोबर सर्व्ह करा.

## सल्ला

### कपड्यांवरील शाईचे डाग घालविण्यासाठी

कपड्यांवर शाईचे डाग पडले असतील तर त्यावर लिंबाची चतकोर फोड घालून कपडा चटकन धुवून टाका.

## वास्तू

दिव्यात गाईचे तूप घालून तो जळत ठेवल्यास त्या घरात आनंद व शांती निर्माण होते.

## सौंदर्य

त्वचेला ओलसरपणा आणण्यासाठी मॉइश्चरायझर वापरतात. आपल्याला ते घरच्या घरी तयार करता येतो. ते असे ताज्या लिंबाचा रस २ चमचे + २ चमचे ग्लिसरीन. यात ६ थेंब रोझ वॉटर टाका. हे सर्व मिश्रण चांगले हालवून एक करा. नंतर ते स्वच्छ कोरड्या बाटलीत घालून फ्रीजमध्ये ठेवावे. रात्री झोपण्यापूर्वी हे मिश्रण अर्धा तास चेहऱ्यावर चोळून जिरवावे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

# दैनिक पंचांग

**शुक्रवार, दि. ५ जुलै २०२४**

दर्श अमावास्या, पुनर्वसु रवि, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, ज्येष्ठ कृष्णपक्ष, आर्द्रा २८।०६

सूर्योदय ०६ वा. २६ मि. सूर्यास्त ०६ वा. २८ मि.

**राशिभविष्य-**

**मेष** : प्रेम संबंधांमध्ये स्थिती होकारात्मक राहील. मित्रांच्या मदतीने कार्य पूर्ण होतील. मान-सन्मानात इच्छानुरूप वाढ होईल.

**वृषभ** : महत्वाच्या कामांमध्ये सुरळीतरीत्या सहयोग मिळेल. कौटुंबिक वातावरण आनंदाचे राहील. आर्थिक प्रकरणां मध्ये काळजीपूर्वक कार्य करा.

**मिथुन** : लेखन कार्यातील अडचणी दूर होतील. पत्नीपासून लाभ मिळेल. कौटुंबिक विषयांमध्ये सहयोग द्यावा लागू शकतो. आरोग्य उत्तम राहील.

**कर्क** : आरोग्य बरे राहील. सर्जनशील व्यक्तींना वाव मिळेल. दिवस आनंदात व्यतीत होईल. व्यापार-व्यवसाय सुरळीत राहील. वाहने सावकाश चालवा.

**सिंह** : राजकीय कार्ये होतील. कौटुंबिक वातावरण उत्तम राहील. आरोग्याच्या दृष्टीने काळ अनुकूल आहे. वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील.

**कन्या** : वैवाहिक सुख वाढेल. नोकरपेशा व्यक्तींसाठी काळ चांगला आहे. मानसिक स्थिरता वाढेल.

**तूळ** : मान-सन्मानात वाढ होईल. शत्रू पराभूत होतील. व्यापार-व्यवसायात सुखद स्थितीचे वातावरण राहील. स्त्री पक्षाचा आधार राहील.

**वृश्चिक** : ध्येय साध्य करण्यात पूर्ण यश मिळेल. कौटुंबिक विषयांमध्ये वेळ चांगला जाईल. व्यापार-व्यवसायात सावधगिरी बाळगा. शत्रूंपासून सावध राहा.

**धनु** : व्यापार-व्यवसायात स्थिती नरम-गरम राहील. प्रवास काळजीपूर्वक करा. कामात सावधगिरी बाळगा.


**मकर** : मित्रांचा आधार घेऊन कार्य करा. आरोग्य उत्तम राहील. कौटुंबिक विषयांमध्ये वेळ अनुकूल राहील. अधिक श्रम करावे लागतील. आरोग्य मध्यम राहील.

**कुंभ** : आरोग्य उत्तम राहील. काही काळ कठीण गेल्यानंतर यश मिळेल. मान-सन्मानात वाढ होईल.

**मीन** : कौटुंबिक वाद-विवाद टाळा. आज घरगुती जबाबदाऱ्यांमध्ये आपली प्रगती आपणास संतुष्टी देईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

## फिल्मीचक्कर क्र. ११४५ सौ. शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) 'पंछी होते तो उड जाती रे' हे गाणे असलेला चित्रपट (चित्रपटाचे नाव) ५) जितेंद्र, हेमामालिनी, प्रेम चोप्रा यांचा एक चित्रपट ६) अभिनेत्री हेमामालिनीची एक अभिनेत्री मुलगी ८) ++ बदन (चित्रपटाचे नाव) १०) अनिल कपूर, श्रीदेवी, रवीना टंडन, अनुपम खेर, फरिदा जलाल यांचा एक चित्रपट ३) शशी कपूर, हेमामालिनी, मदन पुरी यांचा एक चित्रपट १३) अब आयेगा ++ (चित्रपटाचे नाव) १५) झुक गया ++++ (चित्रपटाचे नाव) १७) धर्मेंद्र, शर्मिला टागोर यांचा एक चित्रपट १८) 'आज मेरे ++ की शादी है (गाणे) १९) +++ हराम (चित्रपटाचे नाव) २०) मिथुन चक्रवर्ती, रंजिता, जगदीप यांचा एक चित्रपट

**उभे शब्द :-** १) संजीवकुमार, अनिता राज, फारूक शेख, अंजली सेन, उत्पल दत्त, पिंचू कपूर, दिनेश हिंगू यात आहेत २) अमिताभ बच्चन, झिनत अमान, रणजीत यांचा एक गाजलेला चित्रपट ३) ++++ + ++ फरिश्ता प्यार का सबक सिखलाने को (गाणे) ४) जितेंद्र, लीना चंदावरकर, मदन पुरी यांचा एक चित्रपट ७) 'शोले' नंतरचा जी. पी. सिप्पी व रमेश सिप्पी यांचा एक मोठा चित्रपट ९) संजीवकुमार, वहिदा रेहमान, शर्मिला टागोर, शबाना आझमी, किरण वैराळे यांचा एक विनोदी चित्रपट ११) एक दिवंगत चित्रपट गीतकार ++++ जयपुरी १२) 'मुंबईचा घरगडी' या अर्थाचा शब्द १४) +++ समझा करो (चित्रपटाचे नाव) १६) यात श्रीदेवी नागीण झाली आहे तर अमरीश पुरी गारुडी झाला आहे

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : बंद राहिलेले पुस्तक म्हणजे कागदाची केवळ रद्दीच होय.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### आजकाल देवीची लस का देत नाहीत?

'देवीचा रोगी कळवा, हजार रुपये मिळवा' हे वाक्य तुम्ही वाचले असेल. आता तर अशा घोषणाही बंद झाल्या आहेत. कारण जगातून देवी या रोगाचे समूळ उच्चाटन झाले आहे. जागतिक आरोग्य संघटनेने दि. ८ मे १९८० रोजी 'जगातून देवी' या रोगाचे समूळ उच्चाटन झाले आहे', असे जाहीर केले. त्यानंतर जगात देवीचा एकही रुग्ण सापडलेला नाही. देवीच्या विषाणूंचेच जगातून पूर्णपणे उच्चाटन झाले आहे.

पूर्वी देवी हा एक भयंकर रोग मानला जात असे. या रोगामुळे पुरळ येई. चेहऱ्यावर व्रणांमुळे विद्रूपता येई. कधी कधी अंधत्व येत असे वा मृत्यूही होई. देवी झालेल्या व्यक्तीला ताप असे व तिला प्रचंड थकवा येई.

देवी हा रोग भयंकर असल्याने तो होऊ नये यासाठी प्रतिबंधक लस द्यावी लागे. ती लस देणे, देवीचे निर्मूलन झाल्याने १९८० नंतर बंद करण्यात आले. साहजिकच त्यांचा जन्म १९८० नंतर झाला आहे. त्यांना ही लस देण्यात आली नाही.

देवीचे पुनरागमन होण्याचा धोका लक्षात घेऊन संघटनेने न्यूयॉर्क व मॉस्को या दोन ठिकाणच्या प्रयोगशाळांमध्ये देवीच्या लसीचा पुरेसा साठा करून ठेवलेला आहे.

त्यामुळे अचानक उद्‌भवणाऱ्या गंभीर प्रसंगाला यशस्वीपणे तोंड देता येईल. देवीचे निर्मूलन करण्यासाठी आरोग्य क्षेत्रातील तज्ञ सध्या कार्यरत आहेत.

## घाई केली अंगाशी आली

त्या रानातील ससे नेहमीच भेदरलेले असत. एक गरुडपक्षी आकाशात घिरट्या घालीत- घालीत एखाद्या ससाला अलगद पंज्यात पकडून क्षणात पळवून नेत असे. ससे खायला तो गरुड अगदी सोकावला होता. त्यामुळे ससे दबकत, दबकत लपून छपून गवत खाऊन लगोलग आपल्या बिळात लपून बसत. पण एकदा एक रानमांजर भक्ष्याच्या शोधात तेथे आले आणि दबा धरून बसले. आकाशात घिरट्या घालणाऱ्या गरुडाला वाटले हा जरा मोठाच ससा दिसतो आहे. त्याने मागचा पुढचा विचार न करता क्षणात झडप घालून त्या रानमांजराला उचलून आकाशात नेले, पण थोड्याच वेळात त्याला आपण भलतेच कोणाला तरी पकडून आणले, याची जाणीव झाली.

ससा समजून आपण चक्क मांजरीला पकडून आणले हे त्याला कळले.

पण तोपर्यंत फार उशीर झाला होता, कारण मांजरीने आपले पंजे गरुडाच्या मानेला लावून त्याचा गळा आवळण्यास सुरुवात केली होती. थोड्याच वेळात गरुड गुदमरून मेला आणि जमिनावर पडला.

**तात्पर्य** : घाईने एखादे कार्य करायला गेले, तर कधी कधी त्याचे परिणाम उलटे होऊन अनर्थ ओढवतो.

## जीवन चक्र



कारण, त्याला शेकडो रुपयांचे हजारो रुपये करायचे होते. तो अधिक धन मिळवू लागला पण तो एवढ्याने संतुष्ट झाला नाही. त्याने हजारो रुपयांचा दहा हजारांमध्ये करण्याचा निर्णय घेतला. आणि त्यासाठी त्याने अधिक कष्ट करण्यास सुरुवात केली. सुतार शांत रहाण्याऐवजी अधिक वेळ काम करू लागल्याने जास्त गोंगाट होऊन शेजाऱ्याची योजना असफल झाल्याने तो हैराण झाला.

जेव्हा सुताराने दहा हजार रुपये कमवले तेव्हा तो लाखो रुपये कमवण्याची ईच्छा करू लागला. स्वतःवर कामाचा अधिक दबाव घेवून रात्रंदिवस तसेच तो आठवड्याच्या शेवटीही काम करू लागला. लवकरच त्याने गाणे गुणगुणने सोडून दिले. आता त्याला त्यांच्या कामातून आनंद मिळत नव्हता तर स्वतःवर लादल्या गेलेल्या दबावामुळे तो घुसमट अनुभवू लागला. अनेकदा रात्री तो इतका तनावात असे की त्याला झोपही लागत नसे. जी अंतरीय संतोष आणि शांती त्यामध्ये होती जेव्हा तो गरीब होता, जास्त पैसे कमवण्यात ती नष्ट झाली.

आपल्या जीवनावर आपण नजर टाकू. काय आपल्या लक्षात येते का की आपण सर्व वेळ पैसे कमाविण्यात लावतो, आपण सेवानिवृत्त होवू शकू काय? जेणेकरून आपण जास्त पैसे कमविण्यासाठी अधिक वेळ काम करतो? अधिक लाभ मिळविण्यासाठी आपण मधल्या सुट्टीत काम करतो? आपल्या कामकाजातुन एक दिवस किंवा काही तासही असे नसतील की आपण आपल्या कामकाजाबद्दल विचार करीत नाही का? जर आपल्या बरोबर असे घडत असेल तर आपण सुतारा सारखे बनत आहोत की काय?

जर आपण सर्व जगातील धन कमवले आणि आपल्याला शांती आणि आनंद मिळत नसेल तर त्या कामाचा काय फायदा? आपण जास्त वेळ घालवत असू व आपला परिवार आपला शौक आणि अध्यात्मिक गतिविधिसाठी तसेच आपल्या आवडत्या गोष्टीसाठी योग्य वेळ देऊ शकत नाही तर आपण विश्लेषण करायला हवे की आपण खरेच योग्य करतोय का? भविष्यासाठी पैसे साठवून ठेवणे हे चांगले आहे, पण संपुर्ण जीवन इतके धन कम विण्यात घालविणे ज्यांची आपणास गरज नाही हे योग्य आहे का?

**(कृपाल आश्रम, अहमदनगर)**

## शुद्ध जीवन जीने के मंत्र

मधुबन से आते ही सबसे पहले मैंने एक चीकू के पेड पर योग का प्रयोग करना शुरु किया । वह काफी पुराना वृक्ष था लेकिन एक भी चीकू उस पर नहीं लगता था । रोज सवेरे अमृतवेले १०/१५ मिनट घर में बैठकर ही इस पेड के लिये विशेष योगदान देना (शुद्ध संकल्प से प्रकम्पन देना) शुरु किया। यह संकल्प दिया कि तुम कितने अच्छे पेड हो, कितने बड़े हुए हो, कितनी अच्छी छाँव देते हो। हम यह भी जानते हैं कि तुम पर कोई फल नहीं लगता इसलिये तुम दुःखी हो और हमारे परिवार वाले भी तुमसे नाराज़ हैं। उन्होंने तुम्हें काटने का फैसला किया है लेकिन अब तुम बिल्कुल घबराओ नहीं। प्रकृतिपति परमात्मा स्वयं तुम्हारे लिये इस धरती पर आये हैं। देखो, तुम्हारे ऊपर उनसे कितनी पवित्र, शुद्ध, शक्तिशाली किरणें फैल रही हैं। इस तरह के संकल्पों के साथ मैंने रोज़ मन-बुद्धि से यह चित्र देखना शुरु कर दिया कि पूरे पेड़ पर बहुत सारे चीकू लगे हैं।

कुछ महीने के बाद जब चीकू का मौसम आया तो पूरे पेड़ पर बड़े-बड़े चीकू लगे। यह देखकर मुझे और मेरे परिवार को भी बड़ा आश्चर्य हुआ और खुशी भी हुई। फिर मैंने चावल की खेती पर योग का प्रयोग किया। बीज को ५ दिन राजयोग द्वारा शुद्ध-शक्तिशाली प्रकम्पन देकर उन्हें खेत में अंकुरित होने के लिये थोड़ी-सी जगह पर डाल दिया। ऐसे वक्त पर कबूतर और चिड़ियों का झुण्ड बीजों को चुगने के लिये आता है लेकिन उनसे संकल्प शक्ति से दोस्ती कर उनको बताया कि यह शाश्वत यौगिक खेती है जिसे देखकर दूसरे किसानों को भी परमात्म शक्ति का अनुभव होगा और पर्यावरण शुद्ध रखने में मदद मिलेगी। इसके लिये आपको हमारी खेती पर बीज नहीं चुगना है और सचमुच आस-पास के किसान यह देखकर चकित हो गये कि यह छोटे-छोटे पंछी आस-पास की खेती के बीज चुगकर चले गये, हमारी खेती में उन्होंने कोई नुकसान नहीं किया।

इस बार मैंने खेती में कोई रासायनिक खाद नहीं डाली सिर्फ गाय का गोबर डाला। इस वजह से पड़ोसी किसान महिलायें कहने लगी कि अगर रासायनिक खाद नहीं डालोगी तो खेती में धान नहीं उगेगा।

साल भर के अनाज का क्यों नुकसान करती हो? क्या साल भर चावल खरीदकर खाओगी? इन बातों को सुनकर मेरा मन घबरा गया। कई तरह के अशुद्ध विचार चलने लगे कि अगर ठीक से धान नहीं उगा तो क्या होगा? सब लोग मुझे हंसेंगे। क्या करूँ समझ में नहीं आ रहा था। मन व्यर्थ से भरा हुआ होने के कारण परमात्मा की याद से खेती में शुद्धशक्तिशाली प्रकम्पन फैलाने मुश्किल हो गये। मेरे व्यर्थ और चिंताग्रस्त विचारों का असर पूरी खेती पर दिखने लगा। खेती धीरे-धीरे झुकने लगी, सूखने लगी और मैंने जान लिया कि अब तो यह खेती खत्म हुई।

मायूस होकर मैंने कोल्हापुर की ब्रह्माकुमारी मनीषा बहन को फोन किया जिन्होंने यौगिक खेती के लिये प्रेरित किया था। मेरी बातों को सुनकर उन्होंने कहा कि सबसे पहले अपने व्यर्थ संकल्पों को रोक दो। खेती आपकी नहीं, परमात्मा की है। स्वयं भगवान इस खेती का रक्षक है।

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**


## हसा आणि शतायुषी व्हा!

प्रेत घेऊन जाणाऱ्या माणसास भरधाव सायकल वरून जाणाऱ्या एका सायकल स्वाराचा धक्का लागल्याने प्रेत खाली पडते. लोक चिडून सायकल स्वाराला म्हणाले, ''मूर्खा! दिसत नाही का तुला! लाज वाटत नाही.'' प्रेताला धक्का लागून ते खाली पडले ना!

**सायकलस्वार :** धक्का लागून जो माणूस खाली पडलाय तो गप्प आहे आणि तुम्ही उगाचच मला बोलताय.
ही काय पद्धत झाली का राव?

## रविंद्रनाथ टागोरांच्या कविता

(मूळ इंग्रजीत)



अज्ञाताकडून जर प्रवाह ज्ञाताकडे वाहात
जात असेल तर ते निरंतर सत्यच सुंदर असतेय
त्याचा प्रतिध्वनी जो अज्ञाताकडे जाऊन
धडकतो तो सौंदर्य व आनंद याची प्रचिती देतो

**मूळ इंग्रजी कविता – रविंद्रनाथ टागोर**
**मराठी अनुवाद – अरविंद ब्राम्हणे,**
भिंगार मो. ९४०३७३४२८९

# स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

अशा वेळी स्तन दुखल्यामुळे माता बालकाला दूध पाजत नाही व दूध स्तनांमध्ये साचून राहते. जखमेमुळे जंतुसंसर्ग अजूनच वाढीस लागतो. अशा वेळी डॉक्टरांच्या सल्ल्याने वेदनाशामक औषधे घ्यावीत. प्रसूतीनंतर स्तनांमध्ये दूध साचून पू तयार होण्याच्या आजाराला आयुर्वेदामध्ये 'स्तनविद्रधी' म्हणतात. शिळे, उष्ण, रुक्ष व दाह निर्माण करणारे अन्न खाल्ल्यामुळे तसेच चुकीचा विहार केल्यामुळे रक्तदुष्टी होते. प्रकुपित झालेले दोष स्तनांमध्ये विद्रधी (पू) उत्पन्न करतात.

आयुर्वेदिक चिकित्सा – विद्रधीमध्ये लेपगोळी, काळाबोळ, रक्तचंदन आणि सागरगोटा यांचा लेप द्यावा. त्याचे पाचन व्हावे म्हणून आमपाचक वटी, त्रिभुवनकिर्ती, सूक्ष्म त्रिफळा, त्रिफळा गुग्गुळ, गंधक रसायन यांसारखी कल्पे वापरावीत. दुष्ट स्तन्य (दूध) स्तनातून बाहेर पडण्यासाठी गरम पाण्याच्या धारेने शेक द्यावा. एवढे करूनही जर विद्रधी पक्व झाला, तर कृष्णमंडळ व स्तनाग्रे कौशल्याने वगळून शस्त्रक्रिया करावी. शस्त्रक्रिया करताना स्तन्यवाहिन्या स्तनाग्रांमध्ये सरळ उभ्या येत असल्याने उभाच छेद घ्यावा. आडवा छेद घेऊ नये. कारण त्यामुळे स्तन्यवाहिन्या तुटण्याची शक्यता असते.

चाळिशीनंतर स्तनांची काळजी – चाळिशीनंतर स्त्रीचा प्रत्येक अवयव निस्तेज दिसायला लागतो. कारण शरीरामध्ये इस्ट्रोजन हार्मोन्सची निर्मिती कमी प्रमाणात होते. स्तनांमधील ढौलदारपणा, काठिण्य कमी होऊन ते लोंबू लागतात. त्यामुळे आपले तारुण्य संपले असे प्रत्येक स्त्रीला वाटते. परंतु इतके वर्षे संसार केल्यानंतर पती-पत्नीमधील प्रेम केवळ शारीरिक आकर्षणापुरते मर्यादित राहत नाही. खरी गरज असते ती मानसिक आधाराची, एकमेकांच्या साथीची! त्यामुळे या वयात स्तनांचे आरोग्य कसे चांगले राहील याकडे लक्ष दिले पाहिजे. ढौलदारपणा व काठिण्य राहाण्यासाठी अंघोळीच्या वेळी आयुर्वेदिक तेलाने मसाज करावा. यामुळे स्तनांचे सौंदर्य वाढते आणि स्तनामध्ये गाठ असल्यास लवकर लक्षात येते. या वयामध्ये हार्मोन्सच्या असंतुलनामुळे स्तनांमध्ये गाठी होण्याचे प्रमाण वाढते. गाठीसोबत स्तनाग्रातून काळपट रंगाचे रक्त येत असेल, तर लगेच डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. बऱ्याचदा ही गाठ कर्करोगाची असू शकते. साधी गाठ गोलाकार व एका जागेवरून दुसऱ्या जागी सरकणारी असते; तर कर्करोगाची गाठ ही अनियमित आकाराची व एका जागी घट्ट चिकटलेली असते. कुठलीही गाठ कर्करोगाची असू शकते. म्हणून गाठ आल्यास नेहमीच डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. स्तन्यस्राव बाळाच्या जन्मानंतर स्तनांमधून दुग्धस्राव (स्तन्यस्राव) होणे नैसर्गिक असते.

(क्रमशः)

**– डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# नगरच्या 'भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल'चे ४४ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत राज्याच्या व जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत

## कल्याणी गदादे राज्यात सतरावी तर ओम मिसाळ सोळावा


भाऊसाहेब फिरोदिया हायस्कुलचे शिष्यवृत्ती परिक्षेत यशस्वी झालेले ४४ विद्यार्थी. समवेत संस्थेच्या प्रमुख श्रीमती छायाताई फिरोदिया, गौरव फिरोदिया, अशोक मुथा, प्रकाश गांधी आदी पदाधिकारी.

नगर – अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल मधील विद्यार्थ्यांनी राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने फेब्रुवारी २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती व पूर्व माध्यमिक शष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. विद्यार्थ्यांनी शाळेच्या निकालाची उज्वल परंपरा या वर्षीही कायम राखली असून, राज्याच्या व जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत ४४ विद्यार्थ्यांनी स्थान पटकाविले आहे. राज्याच्या गुणवत्ता यादीत इयत्ता ५ वी मधील कल्याणी गदादे ही सतरावी तर इयत्ता ८ वी मधला ओम मिसाळ याने सोळावा येण्याचा बहुमान पटकाविला आहे.

या गुणवंत विद्यार्थ्यांचा शाळेत संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य उल्हास दुगड, पर्यवेक्षिका आशा सातपुते, पर्यवेक्षक बाळासाहेब वाव्हळ, विष्णू गिरी आदींसह मार्गदर्शक शिक्षक उपस्थित होते.



इयत्ता ५ वी च्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत २४ विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत चमकले आहेत. यामध्ये कल्याणी गदादे ही राज्यात सतरावी तर जिल्ह्यात आठवी आली आहे.

तसेच जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत ऋत्विक कासार, तेजल ठाणगे, श्रीअंश जोशी, मृणाल डोईफोडे, आशुतोष म्हस्के, ज्ञानेश्वर झरेकर, श्रेयश लाड, सान्वी जाधव, दुर्वा निमसे, स्वरराज चव्हाण, तनया पळसकर, स्वराज ठाणगे, सोहम रायकर, आराध्या खुळे, प्रगती चौतमाल, पुनम गुंड, अर्णव वाबळे, जिनिशा गांधी, अथर्व गडाख, अनन्या वांद्रे, आराध्या गायके, आर्यन कंठाळे, श्रीराम शिंदे यांचा समावेश आहे.

इयत्ता ८ वी च्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत शाळेचे २० विद्यार्थी चमकले आहे. यामध्ये ओम मिसाळ राज्यात सोळावा तर जिल्ह्यात तिसरा आला आहे. तसेच जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत स्वामिनी दहातोंडे, शिवतेज शिंदे, प्राजक्ता सैंदाणे, प्रथमेश भांबरे, श्लोक कार्ले, रुद्रावर्त देशपांडे, अक्षरा भुजबळ, चैतन्य शिंदे, श्रेया कार्ले, स्वरिका जासूद, गौरी बांदल, श्रीराम ढोले, अनुजा गर्जे, गुंजन गोले, सुरज कुटे, कृष्णा जपे, धनराज शेळके, शताक्षी नगरकर, नक्षत्रा इप्पलपेल्ली यांचा समावेश आहे.

इयत्ता ५ वीच्या विद्यार्थ्यांना वैशाली मेहेर, बाळासाहेब पालवे, अतुल बोरुडे, शीतल डिमळे, अपर्णा कमलकर, मिनाताई साबळे, सविता जासूद, गणेश गायकवाड यांचे तर इयत्ता ८ वीच्या विद्यार्थ्यांना प्रगती बेगडे, योगिनी क्षीरसागर, राजलक्ष्मी कुलकर्णी, शिल्पा नगरकर, सुलभा कुलकर्णी, अंजली गोले, सुषमा मुदगल, वैभव पडोळे या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

छायाताई फिरोदिया यांनी गुणवंत विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देऊन गुणवत्ता टिकवून भवितव्य घडविण्याचे सांगितले. संस्थेचे सहकार्यवाह गौरव फिरोदिया, उपाध्यक्ष अशोक मुथा, खजिनदार प्रकाश गांधी यांनी गुणवंत विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन केले.

# आयुर्वेद समज – गैरसमज : भाग २

## दही व ताक

बहुतांश लोकांचा समज असतो की, दही आणि ताक हे दोन्ही पदार्थ थंड आहेत. त्यामुळे उन्हाळ्यात, उष्णता असताना यांचे सेवन करावे.

सत्य – मुळात दही आणि ताक हे दोन्हीही पदार्थ उष्ण गुणधर्माचे आहेत. ते स्पर्शाला आल्हादकारक असतात किंवा फ्रिजमध्ये ठेवल्या कारणाने थंड असतात, त्यामुळे असा समज होण्याची शक्यता असते. हे उष्ण गुणधर्माचे पदार्थ उन्हाळ्यात, ऑक्टोबर हिटच्या काळात खाण्यात आल्यास त्यातून उष्णता अधिक वाढण्याचा संभव असतो.

खरंतर दही हे उत्तम गुणांचे आहे. शरीरात स्निग्धता निर्माण करणारे, धैर्य आणि बुद्धी वाढवणारे, धातूंना पोषण करणारे – विशेषतः मांस, शुक्र या धातूंना वाढवणारे असते. त्यामुळेच पूर्वीच्या काळी युद्धप्रसंगी किंवा आज देखील परीक्षांना सामोरे जाताना हातावर दही साखर देण्याची प्रथा आपल्याकडे आहे. दह्याचे हे गुणधर्म शरीराला लाभतात तेव्हाच; जेव्हा आपण आयुर्वेद नियमानुसार त्याचे सेवन करतो.

आपल्यापैकी बऱ्याच जणांना आठवत असेल आणि आजही तो परिपाठ पाळला जातो की, रात्रीच्या वेळेस दही खायला दिले जात नाही. यामागचे कारण म्हणजे, दही शरीरामध्ये अभिष्यंद अर्थात चिकटा उत्पन्न करते. हा चिकटा पचनसंस्था व शरीरातील पोकळ्यांमध्ये जाऊन त्यांच्या कामामध्ये अडथळा निर्माण करतो आणि शरीरामध्ये अपचन, सूज उत्पन्न होणे, रक्तात दोष निर्माण होणे, त्वचा विकार, स्थौल्य यापासून ते मधुमेह असे कफाचे विकार देखील उत्पन्न करतो.

तसेच दही उन्हाळ्या बरोबरच ऑक्टोबर हिटच्या दरम्यान आणि वसंत ऋतू (फेब्रुवारी – मार्च) मध्ये न खाण्याबद्दल आयुर्वेद सुचवतो. वसंत ऋतुच्या दरम्यान शरीरामध्ये कफ वाढत असतो. तेव्हा दही खाण्यात आल्यास कफ अत्याधिक प्रमाणात वाढून सर्दी, खोकला, दमा, त्वचा विकार असे कफाचे वेगवेगळे आजार होण्याची संभावना असते.

दही हे पूर्णतः विरजलेले असणे अपेक्षित आहे. आधमुरे दही विविध रोगांना कारण ठरते. तसेच फक्त दही न खाता त्याबरोबर मुगाचे वरण, मध, साखर यापैकी एक घ्यावे. यातील दही आणि साखर खाणे हे प्रचलित देखील आहे.

दह्यामध्ये चार ते सहा पट पाणी घातल्यानंतर घुसळून घेऊन ताक तयार होते. ताक देखील दह्याप्रमाणेच उष्ण गुणधर्माचे आहे. परंतु त्याबरोबरच ताकामध्ये आहाराचे पचन करण्याचा गुणधर्म देखील आहे.

ताकामध्ये जिरे पूड, सैंधव मीठ घालून त्याची चव अजून वाढवता येते आणि गुणधर्म देखील त्या बरोबरीने वाढतात. दह्यापासूनच बनलेले असले तरी ताक मात्र सूज कमी करते. परंतु कफ असताना, घशात खवखवत असताना, सर्दी, खोकला असताना ताक घेऊ नये. सातत्याने नाकातून रक्तस्त्राव होणे, चक्कर येणे असे विकार असताना देखील ताक न घेतलेलेच बरे. मात्र जेवताना पचन म्हणून अन्नाची रुची वाढवण्यासाठी ताक अवश्य असावे. दही आणि ताकापासून वेगवेगळे पदार्थ केले जातात, उदाहरणार्थ लस्सी, कढी इत्यादी. यांचे गुणधर्म देखील दही व ताकांप्रमाणेच समजावे आणि प्रमाणतः आहारामध्ये त्यांचा समावेश असावा.

– डॉ. सौ. पूजा कोटस्थाने,
साई संजीवनी क्लिनिक, संदेशनगर, श्रीराम चौक, पाईपलाईन रोड, अहिल्यानगर.
संपर्क – ९५६१०८६८०१/०२४१ – २४२४३२३
– डॉ. समर्थ कोटस्थाने,
मन:स्वास्थ्य आयुर्वेद चिकित्सालय, शहर बँकेसमोर, भिडे चौक, सावेडी, अहिल्यानगर.
संपर्क – ९५६१०८६८०१ / ९८२२१०७०३७

# भगवान श्री जगदीश रथयात्रेचे ७ जुलै रोजी नगरमध्ये आयोजन



नगर – श्री विष्णूचे अवतार भगवान श्री जगदीश यांच्या रथयात्रेचे आयोजन ७ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजता नगरमध्ये करण्यात आले आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी लालटाकी येथील श्री खाकीदास बाबा (माहेश्वरी) मठाच्या वतीने भगवान श्री जगन्नाथ, बलभद्र व सुभद्रा यांच्या रथयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती खाकीदास बाबा मठाचे अध्यक्ष दीपक काबरा यांनी दिली.

७ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजता लालटाकी येथील खाकीदास बाबा मठा पासून या रथयात्रेला सुरवात होणार आहे. ही रथयात्रा खाकिदास बाबा मठ ते अप्पू चौका पर्यंत जावून पुन्हा मठात येवून समारोप होईल. यावर्षी शरद मदनलाल झंवर हे या रथयात्रेचे यजमानपद भूषवणार आहेत. या रथयात्रेत सर्व भाविकांनी सहभागी व्हावे असे आवाहन खाकीदास बाबा मठाच्या विश्वस्तांनी केले आहे.

# पर्यावरण दिनानिमित्त कार्मेल कॉन्व्हेंट माध्यमिक शाळेत वृक्षारोपण



केडगाव येथील कार्मेल कॉन्व्हेंट माध्यमिक शाळेत वृक्षारोपण करताना शिक्षक वर्ग. दुसऱ्या छायाचित्रात प्रमुख पाहुणे विशाल लाहोटी यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना प्राचार्या सिस्टर लिटिल रोज. समवेत प्राध्यापक वर्ग.

नगर – केडगाव येथील कार्मेल कॉन्व्हेंट माध्यमिक शाळेत जागतिक पर्यावरण दिनानिमित्त १ जुलै रोजी वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नगर येथील ट्रेककॅम्पचे विशाल लाहोटी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी कारमेल शाळेकडून विशाल लाहोटी यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले तसेच वृक्षारोपण देखील करण्यात आले.

यावेळी विशाल लाहोटी यांनी मुलांना जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरणाचा समतोल कशा पद्धतीने राखावा कशा पद्धतीने आपण ट्रेकिंगला किंवा कुठे फिरायला गेलो असताना प्लास्टिक व घाण कचरा करू नये तसेच आपण बाहेर कुठे गेलो असताना एक कापडाची पिशवी घेऊन जाणे आवश्यक असल्याचे देखील सांगितले यामुळे पर्यावरणाची हानी होणार नसल्याचे त्यांनी सांगितले. मुलांनी जर खाद्यपदार्थ कुठे फिरायला गेले असताना सोबत नेले तर ते व्यवस्थित ठेवून तसेच त्याचे रॅपर परत आपल्या घरी घेऊन येऊन आपल्या घरच्या डस्टबिन मध्ये टाकावे जेणेकरून जनावरे किंवा इतर प्राणी हे विखुरलेले प्लास्टिक खाणार नाहीत व त्यांना कुठल्याही प्रकारची हानी होणार नाही कारण आपण जे प्लास्टिकचे रॅपर खाद्यपदार्थ खाऊन ते फेकून देतो ते किंवा त्याच्या वासाने जनावरे व इतर पशुपक्षी आकर्षित होतात व ते प्लास्टिक खातात व त्यामुळे त्यांच्या पचनाला त्रास होतो आणि मग काही कालांतराने त्यांचा मृत्यू होतो त्यामुळे कृपया कोणीही प्लास्टिकचे वापर किंवा अशा प्रकारचे पदार्थ हे रस्त्यावर टाकू नये असे त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले त्यानंतर त्यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण संरक्षणाची शपथ देखील दिली यावेळी कार्मेल कॉन्व्हेंट हायस्कूलच्या प्राचार्या सिस्टर लिटिल रोज, प्राध्यापक व शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते यावेळी शाळेतील मुलांनी देखील वेगवेगळ्या प्रकारची फुले झाडे आणून शाळेत वृक्षारोपण केले.

# ज्येष्ठ नागरिक संघ ज्येष्ठांसाठी संरक्षण कवच

## खासेराव शितोळे यांचे प्रतिपादन; सोनेवाडी येथे श्री भैरवनाथ ज्येष्ठ नागरीक सेवा संघाची स्थापना


सोनेवाडी येथे अहमदनगर प्रादेशिक विभागांतर्गत श्री भैरवनाथ ज्येष्ठ नागरीक सेवा संघाची स्थापना व कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ अहमदनगर विभागाचे प्रादेशिक अध्यक्ष मा. प्राचार्य खासेराव शितोळे. (छाया – समीर मन्यार)

नगर – ज्येष्ठ नागरिक संघाची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत चालली आहे शहरासह तालुका गाव पातळीवर जेष्ठ नागरिक संघ स्थापन होत आहेत ही एक कौतुकाची बाब आहे ज्येष्ठ नागरिक संघ नेहमी सामाजिक कामात अग्रेसर असतात. संघाच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांचा वेळेचा सदुपयोग होत आहे ज्येष्ठ नागरिक संघ हे ज्येष्ठांसाठी संरक्षण कवच असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ अहमदनगर विभागाचे प्रादेशिक अध्यक्ष (फेस्कॉम) नेरुळ, मुंबई माजी प्राचार्य खासेराव शितोळे यांनी केले.

सोनेवाडी येथे अहमदनगर प्रादेशिक विभागांतर्गत श्री भैरवनाथ ज्येष्ठ नागरीक सेवा संघाची स्थापना व कार्यालयाचे उद्घाटन श्री. शितोळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी नानासाहेब दळवी, कार्याध्यक्ष के. डी खानदेशी, सचिव शिवाजीराव ससे, उपाध्यक्ष शब्बीरभाई पठाण, सल्लागार अशोक आगरकर, नानासाहेब दळवी, संघटना सचिव महादेव डाडर, सोनेवाडी संघाचे अध्यक्ष शिवाजी सुंबे, उपाध्य सिंधुताई फलके, माजी जिल्हा परिषद सदस्य सुरेश सुंबे, सरपंच विठ्ठल दळवी, भाऊ फोपसे, श्रीमती परोडकर, रंजना दळवी, आजी–माझी सर्व ग्रा.पं. सदस्य, वि.का.से.सो.चेअरमन, ज्येष्ठ नागरिक संघाचे सदस्य उपस्थित होते.

पुढे बोलताना श्री. शितोळे म्हणाले की ज्येष्ठ नागरिकांसाठी महाराष्ट्र शासनाची वयोश्री योजना आहे यामध्ये जेष्ठ नागरिकांना दरवर्षाला तीन हजार रुपये वैद्यकीय साहित्य खरेदीसाठी दिले जातात त्याचा ज्येष्ठ नागरिकांनी फायदा घ्यावा याची समाज कल्याण विभागात सविस्तर माहिती मिळेल असे ते म्हणाले.

ज्येष्ठ नागरिक संघाचे प्रादेशिक उपाध्यक्ष शब्बीर पठाण म्हणाले की ज्या आई–वडिलांना आपले मुलं मुली सांभाळत नसतील तर त्यासाठी जेष्ठ नागरिक कायदा २००७ अन्वये प्रांत अधिकारी यांच्याकडे पोटगी साठी आपण दाद मागू शकतो. ज्येष्ठ नागरिकांच्या शासकीय योजनेचा फायदा घेण्यामध्ये कर्जत तालुका हा अव्वल आहे आपणही सर्व योजनांचा लाभ घ्यावा असे ते म्हणाले.

प्रास्ताविकात अशोक आगरकर यांनी ज्येष्ठ नागरिक संघ स्थापना करण्याबाबत व त्याचे सदस्यत्व घेण्याबाबत तसेच ज्येष्ठांसाठी असलेल्या शासकीय योजनांची सविस्तर माहिती देत ज्येष्ठ नागरिक संघ हा ज्येष्ठांचा मोठा आधार असल्याचे सांगितले.

यावेळी संघाचे नूतन अध्यक्ष शिवाजीराव सुंबे म्हणाले की अहमदनगर प्रादेशिक विभागाअंतर्गत सोनेवाडी येथे श्री भैरवनाथ ज्येष्ठ नागरीक सेवा संघाची स्थापना व कार्यालयाचे उद्घाटन अहमदनगर विभागाचे प्रादेशिक अध्यक्ष खासेराव शितोळे यांच्या हस्ते करण्यात आले असून या संघाचे एकूण २५ सभासद आहेत शितोळे सरांच्या मार्गदर्शनाखाली संघाच्या माध्यमातून ज्येष्ठांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्नशील राहील असे ते म्हणाले.

याप्रसंगी अरुणोदय सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, एच.व्ही. देसाई नेत्र रुग्णालय, अ.नगर यांच्यावतीने ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत सर्वरोग निदान व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे आयोजन मुबारक शेख, रामदास वारे, अंबादास दळवी, जनार्धन सुंबे, पावशाराम सुंबे, रोहिदास बोरगे, दत्तात्रय भुतारे, भाऊसाहेब दळवी, आबासाहेब दळवी यांनी केले होते.


अहमदनगर महानगरपालिका कर्मचारी युनियनच्या वतीने प्रभारी आयुक्त सौरभ जोशी यांचा सत्कार करण्यात आला. (छाया – लहू दळवी)

# न्यायालयाच्या आदेशानुसार वारसांना तातडीने नोकरीवर सामावून घेण्यात यावेत

## अहमदनगर महानगरपालिका कर्मचारी युनियनच्या वतीने प्रभारी आयुक्त सौरभ जोशी यांचा सत्कार

नगर – अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रभारी आयुक्त पदी सौरभ जोशी यांची राज्य शासनाच्या वतीने नियुक्ती करण्यात आल्याबद्दल अहमदनगर महानगरपालिका कर्मचारी युनियनच्या वतीने सत्कार करून कर्मचाऱ्यांच्या प्रश्नाबाबत चर्चा केली असता उच्च न्यायालय यांनी लाड–पागे समितीच्या शिफारशींच्या वारस नोकरींसाठी वारसाहकाने नोकरी भरती करण्याच्या कामी स्थगिती आदेश दिलेला होता. या आदेशामध्ये दुरुस्ती करून न्यायालय यांनी १०/४/२०२३ रोजी मेहेतर, वाल्मिकी आणि भंगी समाजातील सफाई काम करणाऱ्या कामगारांना वारस नोकरी देण्याबाबत आदेश दिले होते. त्या आदेशामध्ये उच्च न्यायालय यांनी २४/५/२०२४ रोजी आदेश निर्गमित केलेले आहेत.

या आदेशामध्ये न्यायालय यांनी शेड्युल्ड कास्ट (अनु. जाती) व नवबौद्ध या प्रवर्गातील वारस नोकरी देणेबाबत आदेश दिलेले आहेत. तसेच १०/४/२०२३ च्या आदेशाप्रमाणे जर या कर्मचाऱ्यांचे वारसांचे वव विहीत वयोमर्यादचे पुढे गेले असल्यास त्यांना सामावून घेणेचायतचे आदेश देण्यात आलेले आहेत.

तरी अहमदनगर महानगरपालिकेने लाड–पागे समितीच्या शिफारशीनुसार व न्यायालयाच्या आदेशानुसार वारसांना तातडीने नोकरीवर सामावून घेण्यात यावेत, अशी मागणी यावेळी कर्मचारी युनियनच्या वतीने प्रभारी आयुक्त सौरभ जोशी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी युनियनचे अध्यक्ष बाबासाहेब मुदगल, जितेंद्र सारसर, सचिव आनंदराव वायकर, नंदकुमार नेमाने, राहुल साबळे, महादेव कोतकर, दिपक मोहिते, बाबासाहेब राशिनकर, विजय कोतकर, प्रफुल लोंढे, बाळासाहेब व्यापारी, अमोल लहारे, सागर साळुके, अकिल सय्यद, अनंत लोखंडे आदी उपस्थित होते.

# यश शाह व आर्यन शेट्टी यांनी पटकाविले बॅडमिंटन स्पर्धेमध्ये 'पुण्याचे विजेतेपद'



नगर – पुणे डिस्ट्रिक्ट मेट्रोपोलिओन बॅडमिंटन असो. च्या मान्यतेने पुणे येथे झालेल्या योनेक्स सनराईज व जि. एच. रायसोनी मेमो. पुणे डिस्ट्रिक्ट सुपर–१००० बॅडमिंटन चॅम्पिअनशिप २०२४ या स्पर्धेत दुहेरी खुल्या गटामध्ये येथील खेळाडू यश शाह (पुणे असो.नोंदणीकृत) व सहकारी खेळाडू आर्यन शेट्टी याच्या साथीने अंतिम सामन्यात अक्षय ससे व रोहन जाधव या खेळाडूंवर विजय मिळवत चांदीचा फिरता करंडक व रोख बक्षीस पटकाविले.

२१ ते २९ जून पर्यंत मॉडर्न कॉम्प्लेक्स येथे या स्पर्धा झाल्या या गटात सुमारे ५०० खेळाडूंचा सहभाग होता. पुणे बॅडमिंटन असो. च्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते या विजेत्या खेळाडूंचा सत्कार करण्यात आला.

यश हा सध्या एम बी.ए.चे शिक्षण घेत असून गेल्या चार वर्षांपासून बॅडमिंटनचे गुरु चैतन्य नाईक यांच्याकडे सराव करत आहे व फिटनेसचे धडे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे कोच मिहीर तेहरणीकर यांच्या कडे घेत आहे. या अगोदर राज्याचे १७ व १९ वयोगटाचे एकेरी व दुहेरीचे विजेते पद यशने पटकाविले असून महाराष्ट्राच्या टीमकडून प्रतिनिधित्व केले आहे.

खेलो इंडिया, वेस्ट झोन अश्या राष्ट्रीय, तसेच मालदिव बंगलोर, व्हिएतनाम येथील आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी यशची निवड झाली होती. या ही स्पर्धेमध्ये आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करत सहभागी होऊन यशने प्राविण्य मिळवले होते. बॅडमिंटन वर्ल्ड फेडरेशनच्या मानांकन यादीत यशचे १०१९ असे सध्या स्थान आहे.


रयत शिक्षण संस्थेच्या केडगाव येथील श्री अंबिका विद्यालयातील शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी झालेले विद्यार्थी. समवेत त्यांचे अभिनंदन करताना पद्मश्री पोपटराव पवार, स्वाती औटी आदी.

# अंबिका विद्यालयाचे विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत चमकले

नगर – शहरातील रयत शिक्षण संस्थेच्या श्री अंबिका विद्यालय केडगावचे विद्यार्थी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत चमकले. इयत्ता पाचवीचे आठ विद्यार्थी शहरी गुणवत्ता यादीत शिष्यवृत्तीधारक झाले; तर आठवी शहरी गुणवत्ता यादीत पाच विद्यार्थ्यांनी यश मिळविले.

पाचवी शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांमध्ये इशांत देवकर, वरद भोपळे, अक्षता वाफारे, जयदीप वाबळे, अभिजीत कोल्हे, आर्या कोल्हे, शिवम पवार, आर्यन गाडे हे विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले. पाचवी शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५००० रुपये प्रमाणे सलग तीन वर्षे शिष्यवृत्ती मिळणार आहे. इयत्ता आठवीची विद्यार्थिनी दिशा बाबासाहेब देवकर या गुणवान विद्यार्थिनीने राज्य गुणवत्ता यादीमध्ये २४वा क्रमांक पटकावला. शहरी गुणवत्ता यादी मध्ये ती आठव्या क्रमांकाने शिष्यवृत्तीधारक झाली.

तसेच स्वराली गवारे, विद्या हाडे, अनिकेत वाफारे, वेदांत इंगळे यांनी आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळविले. आठवी शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना प्रत्येकी ७५०० दोन वर्षे मिळणार आहेत.

या विद्यार्थ्यांना विभागप्रमुख स्वाती औटी, बाबासाहेब जगदाळे, विभागीय शिष्यवृत्ती प्रमुख संदीप गाडीलकर, अशोक बडवे, कुशाभाऊ अकोलकर, रोहिणी चोभे, स्वाती चोभे, किसन रोहोकले या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचे पद्मश्री पोपटराव पवार, माजी सचिव शिवाजीराव भोर, रावसाहेब सातपुते, महेश गुंड, किसन सातपुते, कृष्णाजी थोरात, प्रभारी मुख्याध्यापक पोपट घोडके, गुरुकुल प्रमुख बापूसाहेब दिघे आदींनी अभिनंदन केले.

# भारताला 'जागतिक महासत्ता' बनवण्यात सी.ए. अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतील

**सुहास मापारी यांचे प्रतिपादन; नगर सीए शाखेतर्फे सीए वर्धापन दिन वृक्षारोपण, रक्तदानासह विविध कार्यक्रमांनी उत्साहात साजरा**

नगर – स्वातंत्र्यानंतर भारताने आजवर केलेल्या आर्थिक प्रगतीमध्ये इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंट्स ऑफ इंडिया या संस्थेचा मोठा सहभाग असून चार्टर्ड अकाऊंटंटचे आपल्या देशासाठी भरीव योगदान आहे. देश महासत्ता बनण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे. आर्थिक साक्षरता निर्माण करण्यातही सनदी लेखापाल यांचा वाटा आहे, असे गौरवोद्गार अतिरिक्त जिल्हाधिकारी सुहास मापारी यांनी काढले.



इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंटस् ऑफ इंडियाच्या स्थापनादिनी 'सीए दिन' साजरा करताना अतिरिक्त जिल्हाधिकारी सुहास मापारी. समवेत अध्यक्ष सीए सनित मुथा, सीए शाखेचे पदाधिकारी.

इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंट्स ऑफ इंडियाचा स्थापना दिन 'सीए दिन' म्हणून सोमवारी (दि. १) रोजी अहमदनगर सीए शाखेतर्फे साजरा करण्यात आला. या वर्षी संस्थेचा ७६ वा स्थापना दिन होता. त्यानिमित्ताने कार्यक्रमांची रेलचेल होती. नगर सीए शाखेचे अध्यक्ष सीए सनित मुथा यांच्या हस्ते बुरुडगाव रस्त्यावरील आयसीएआय भवन येथे सकाळी ध्वजारोहण करण्यात आले. शाखेचे सचिव सीए अभयकुमार कटारिया यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले, तर उपाध्यक्ष सीए प्रसाद पुराणिक यांनी आभार मानले.

यावेळी वृक्षारोपण, स्वच्छता अभियान राबविण्यात आले. तसेच आपली बांधिलकी आणि सक्रिय सहभाग दर्शविण्यासाठी ३० जून रोजी सीए रन फॉर विकसित भारत या थीम अंतर्गत युनायटेड रन आयोजित करण्यात आला होता. त्यालासुद्धा सीए सभासद आणि विद्यार्थ्यांचा भरघोस प्रतिसाद मिळाला.

यावेळी सुहास मापारी पुढे म्हणाले, भारत जगातील तिसरी आर्थिक महासत्ता बनू पाहत आहे. त्यामध्ये सुद्धा सीएची भूमिका महत्त्वाची आहे. नगर सीए शाखेच्या उपक्रमाविषयी प्रशंसा करताना त्यांनी नगर शाखेला जिल्हा प्रशासनाकडून सर्वतोपरी मदत करण्याची तयारी दर्शविली.

अध्यक्ष सीए सनित मुथा बोलताना म्हणाले, भारतात दरवर्षी १ जुलै हा दिवस राष्ट्रीय चार्टर्ड अकाऊंटंट दिवस म्हणून साजरा केला जातो. आजच्याच दिवशी भारतीय चार्टर्ड अकाऊंटंटसची संस्था आयसीएआय १ जुलै १९४९ मध्ये संसदेच्या एका कायद्याद्वारे अस्तित्वात आली होती. त्यामुळे, आजचा दिवस हा राष्ट्रीय चार्टर्ड अकाऊंटंट दिवस म्हणून साजरा केला जातो. आयसीएआय चे सुमारे ४ लाख सदस्य va 900000 students आहेत, ज्यामुळे सदस्यांच्या बाबतीत ही जगातील दुसरी सर्वात मोठी व्यावसायिक लेखा आणि वित्त संस्था बनली आहे. भारताला २०४७ सालापर्यंत ३० ट्रिलियन इकॉनॉमी बनविण्यामध्ये सीएंचा मोठा सहभाग असणार आहे.

जनकल्याण रक्तपेढी आणि आनंदऋषिजी रक्तपेढी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिरात १०० पेक्षा अधिक रक्त पिशव्यांचे संकलन करण्यात आले.

या कार्यक्रमास नगर सीए शाखेचे सर्व माजी अध्यक्ष, सीए सभासद, विद्यार्थी आणि नागरिकांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नगर सीए शाखेच्या विद्यमान कार्यकारिणीचे सदस्य सर्वश्री सनित मुथा, सीए प्रसाद पुराणिक, सीए अभयकुमार कटारिया, सीए महेश तिवारी, सीए ज्ञानेश्वर काळे, सीए पवनकुमार दरक, सीए विद्यार्थी शाखेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी यांनी विशेष परिश्रम घेतले.



एथर रिझ्टा या नवीन फॅमिली इलेक्ट्रिक स्कूटरचे अनावरण करताना आ. संग्राम जगताप. समवेत रिनेश नय्यर, काका नय्यर, लालू नय्यर, हितेश ओबेराय, सुरेश बनसोडे आदी.

## 'एथर रिझ्टा' नवीन फॅमिली इलेक्ट्रिक स्कूटरचे अनावरण

नगर – एथर रिझ्टा या नवीन फॅमिली इलेक्ट्रिक स्कूटरचे अनावरण आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शोरूमचे संचालक रितेश नय्यर, काका नय्यर, लालू नय्यर, हितेश ओबेरॉय, सुरेश बनसोडे, सावन छाब्रा, वीरेंद्र ओबेरॉय, हर्षल भंडारी, अमन वाही, हर्ष ओबेरॉय, मोसिन मिर्झा, इरफान शेख, भूषण ओस्तवाल आदीसह ग्राहक उपस्थित होते.

यावेळी आमदार संग्राम जगताप म्हणाले की, एथर रिझ्टा ही इलेक्ट्रिकल स्कूटर स्ट्राँग बिल्डअप असणारी, प्रत्येक कुटूंबासाठी सुरक्षित व परवडणारी फॅमिली स्कूटर आहे. ही इलेक्ट्रिक स्कूटर लाँच होण्या आधीच मोठया प्रमाणात बुकिंग झाली आहे. त्याचबरोबर नगरमध्ये इलेक्ट्रिकल वाहनांचा व्यवसाय वाढवून पर्यावरणाचे रक्षण करण्याचे काम नय्यर कुटूंबाने केले आहे.

इतर बऱ्याच इलेक्ट्रिक गाड्या असताना देखील नागरिकांच्या मनात एक फॅमिली इलेक्ट्रिक स्कूटर असली पाहिजे अशी भावना निर्माण असते. व या इलेक्ट्रिक स्कूटरमुळे आपला शहर, जिल्हा व राज्य प्रदूषणमुक्त होईल असल्याची भावना व्यक्त केली तर एथर या नूतन शोरूम चे संचालक रितेश नय्यर म्हणाले की, इलेक्ट्रिकल स्कूटर एथर रिझ्टा या मॉडेलचे अनावरण करण्यात आले असून ही नागरिकांना योग्य दरात परवडणार असून उत्कृष्ट क्वालिटी व संपूर्ण ल्युमिनियम चेसीस्, डिजिटल डिस्प्ले, स्पीड कंट्रोल, ऑटोहोल्ड, लाईव्ह लोकेशन, मोबाईल ॲप, इमर्जन्सी स्टॉप सिग्नल, अँटीथेफ्ट अलार्म सिस्टिम, रिव्हर्स गियर, आलेक्सा सपोर्ट, डिस्क ब्रेक अजून बरेच फिचर्स असून ३ वर्ष बॅटरी वॉरंटीसह ५ वर्षापर्यंत अपग्रेड करता येईल. ही स्कूटर ७ वेगवेगळ्या रंगात उपलब्ध आहे. लवकरच आपल्या महाराष्ट्रात मध्ये एथर एनर्जी चा नवीन प्लांट सुरु होत आहे. एथर रिझ्टा ही इलेक्ट्रिकल स्कूटर मध्ये २.९ kwh आणि ३.७ kwh हे तीन मॉडेल उपलब्ध आहे. तसेच एथर रिझ्टा फायनान्स देखील उपलब्ध आहे. माहितीसाठी संपर्क : ७५०७८७७७७७.

## भिंगार अर्बन बँकेच्या श्रीगोंदा शाखा सल्लागारपदी पोपटराव खेतमाळीस



नगर – भिंगार अर्बन बँकेच्या नुकत्याच झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत बँकेच्या श्रीगोंदा शाखा येथील स्थानिक सल्लागारपदी पोपटराव आनंदराव खेतमाळीस यांची निवड करण्यात आली. चेअरमन अनिलराव झोडगे, व्हाईस चेअरमन किसनराव चौधरी, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शशिकांत महाजन यांनी श्रीगोंदा शाखेमध्ये जाऊन त्यांना नियुक्तीचे पत्र देऊन शुभेच्छा दिल्या.

यावेळी श्रीगोंदा येथील पोपटराव बोरुडे, बापू गोरे, संतोष गोरे, एन.के.कोथिंबीरे, बबन गाडे, सुरेश शेंडगे, काका कदम, शहाजी खेतमाळीस, अनिल बोरुडे, आरिफ मालजपे, बँकेचे वरिष्ठ अधिकारी संजय साळवे, शाखाधिकारी राजेंद्र राऊत, कर्मचारीवृंद उपस्थित होते.

याप्रसंगी चेअरमन अनिलराव झोडगे म्हणाले, पोपटराव खेतमाळीस यांचे सामाजिक क्षेत्रात मोठे कार्य आहे. विविध उपक्रमातून त्यांनी मोठा मित्र परिवार निर्माण केला आहे. भिंगार अर्बन बँकेस त्यांचे नेहमीच सहकार्य राहिले आहे. आता बँकेचे स्थानिक सल्लागार म्हणून भिंगार बँकेच्या प्रगतीस हातभार लावतील.

श्रीगोंदा परिसरातील उद्योजक, सर्वसामान्य यांना बँकेशी जोडण्याचा प्रयत्न करतील, असा विश्वास व्यक्त करुन शुभेच्छा दिल्या.

## सहज फाऊंडेशन व रोटरी क्लबची गुंडेगावच्या जि.प.शाळेस मोठी मदत

नगर – सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात काम करणाऱ्या सहज फाऊंडेशन व रोटरी क्लब ऑफ अहमदनगर मिडटाऊन यांच्या संयुक्त विद्यमाने नगर तालुक्यातील गुंडेगाव येथील पाऊतका वस्ती जिल्हा परिषदेच्या शाळेस विविध वस्तूंची व शैक्षणिक साहित्यांची मोठी मदत करण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांना व शिक्षकांना शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे यासाठी वॉटर फिल्टर, विद्यार्थ्यांना उजळीसाठी शैक्षणिक तक्ते, वाचनालयासाठी गोष्टींची पुस्तके तसेच सर्व विद्यार्थ्यांना स्पोर्टस ड्रेस, जेवण डबे, वॉटर बॅग, बूट व खाऊ देण्यात आला, अशी माहिती सहज फौंडेशनचे अध्यक्ष अशोक अकोलकर यांनी दिली.



नगरच्या सहज फाऊंडेशन व रोटरी क्लब ऑफ मिडटाऊन यांच्यावतीने नगर तालुक्यातील गुंडेगाव येथील पाऊतका वस्ती जि.प.शाळेस विविध वस्तूंची व शैक्षणिक साहित्यांची मदत करण्यात आली.

यावेळी रोटरी क्लब अहमदनगर मिडटाउनच्या माजी अध्यक्षा मधुरा झावरे, सहाय्यक प्रांतपाल क्षितिज झावरे, सहज फौंडेशनचे सागर मेहेत्रे, जालिंदर शिंदे, रामदास सुलाखे, तुषार चोरडिया, अंशुल अग्रवाल, सुचित खोडदे, शाळेच्या मुख्याध्यापिका मनिषा भालसिंग, शिक्षक धोंडीराम कुसळकर, ज्ञानदेव गंगाराम, बबनराव हराळ, माधवराव हराळ, बाळू भापकर, राजेंद्र कुताळ, प्रवीण कुताळ, शरद कुताळ, दादासाहेब आगळे, सुनंदा भापकर आदी उपस्थित होते.

यावेळी मधुरा झावरे म्हणाल्या, रोटरी क्लब कायमच सर्वप्रकारच्या सामाजिक कार्यात पुढे आहे. दुर्गम वाडी –वस्तींवरील शाळेतील विद्यार्थ्यांना सर्व शैक्षणिक सुविधांचा अभाव असतो. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जर सर्व चांगल्या सुविधा मिळाल्यातर त्यांची शैक्षणिक प्रगती होईल. यासाठी शाळेला मदत करण्यासाठी सहज फाऊंडेशनच्या पुढाकाराने व त्यामुळे रोटरी क्लब मिडटाऊनच्या सहकार्याने सर्वप्रकारची मदत केली आहे. शालेय साहित्य मिळाल्यामुळे मुलांचा द्विगुणित झालेल्या आनंदातच आमचे समाधान असल्याचे सांगितले.

मुख्याध्यापिका मनिषा भालसिंग यांनी शाळेच्या प्रगतीचा आढावा सादर केला. तसेच रोटरी क्लबच्या या उपक्रमांचे कौतुक करुन दिलेल्या मदतीबद्दल आभार मानले.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीच्या विक्रीचा व्यवहार केलेला आहे. **सदर मिळकत हि विद्यमान मालक यांचे मालकीची असुन** त्यांच्याच प्रत्यक्ष कब्जात व ताब्यात आहे. सदर मिळकत पुर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असा खरेदी देणाराने म्हणजेच विद्यमान मालकाने खात्री व भरवसा दिला आहे. तथापि कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीज, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ **दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. तसेच हरकत न कळवीता परस्पर वर्तमान पत्रातुन जाहिर केलेल्या हरकतींची काही एक दखल घेतली जाणार नाही मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.
दिनांक ०४/०७/२०२४

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**


जिल्हा अहमदनगर, पोटतुकडी नगरपैकी, **महानगरपालिका हद्दीतील मौजे माळीवाडा** येथील खालील वर्णनाची मिळकत–

| सर्व्हे/ गट नंबर | क्षेत्रफळ हे. आर. | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| ८/२ | ० हे. १५ आर. | सर्व्हे / गट नंबर ८/३ | रस्ता व लागु शिव | सर्व्हे / गट नंबर ८/१ | लागु सर्व्हे/गट नंबर ७ |
| सदर मिळकतीचे विद्यमान मालक - श्री संतोष लहानु सुर्यवंशी रा सारसनगर, अहमदनगर | | | | | |
| ८/३ | ० हे. २२आर. | सर्व्हे / गट नंबर ८/४ | रस्ता व लागु शिव | सर्व्हे / गट नंबर ८/२ | लागु सर्व्हे/गट नंबर ७ |
| सदर मिळकतीचे विद्यमान मालक - श्री अरुण बलभिमराव जगताप, रा. सारसनगर, अहमदनगर | | | | | |
| ८/४ | ० हे. १५ आर | सर्व्हे / गट नंबर ८/५ | रस्ता व लागु शिव | सर्व्हे / गट नंबर ८/३ | लागु सर्व्हे/गट नंबर ७ |
| सदर मिळकतीचे विद्यमान मालक - श्री अरुण बलभिमराव जगताप, रा. सारसनगर, अहमदनगर | | | | | |
| ८/५ | ० हे. १५ आर. | सर्व्हे / गट नंबर ८/६ | रस्ता व लागु शिव | सर्व्हे / गट नंबर ८/४ | लागु सर्व्हे/गट नंबर ७ |
| सदर मिळकतीचे विद्यमान मालक - श्री. हर्षल संतोष भंडारी, रा. टाकळी ढोकेश्वर, पारनेर, अहमदनगर | | | | | |
| ८/६ | ० हे. १५ आर. | सर्व्हे / गट नंबर ८/७ | रस्ता व लागु शिव | सर्व्हे / गट नंबर ८/५ | लागु सर्व्हे/गट नंबर ७ |
| सदर मिळकतीचे विद्यमान मालक - श्री. विलास पोपटलाल कटारिया, रा. बुरुडगांव रोड, अहमदनगर | | | | | |

**ॲड. प्रणव सुधीर धर्माधिकारी**
**ॲड. सौ. नुतन प्रणव धर्माधिकारी**
मो.नं. ९०२८००८२००
पत्ता – भंडारी सावज अपार्टमेंट, कोठीरोड, अहमदनगर


## नगरमध्ये २० व २१ जुलै रोजी मोफत उद्योजकता कार्यशाळा

नगर – जिल्ह्यातील सर्व अनुसूचित जाती व जमाती (एससी/एसटी) मधील युवक, शिक्षक व बेरोजगार युवक–युवती आणि महिलांसाठी नगर शहरातील एमआयडीसी येथे २० जुलै व कोपरगाव येथे २१ जुलै रोजी एक दिवसीय मोफत उद्योजकता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.



महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळ (एम.एस.एस.आय.डी.सी.) व दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्री (डी.आय.सी.सी.आय) च्या वतीने तर शार्प बिझनेस कन्सल्टन्सी व एम.एस.एम.ई. ट्रेनिंग इन्स्टिट्यूटच्या सहकार्याने ही कार्यशाळा होणार असून, यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या कार्यशाळेत अनुभवी तज्ञ प्रशिक्षक शासकीय कर्ज व योजनांची माहिती, उद्योजकता विकास, आर्थिक नियोजन, विक्री व्यवस्थापन व संधी इत्यादी विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. तसेच या प्रशिक्षणात उद्योग उभारणीतील टप्पे, शासकीय–निमशासकीय कार्यालयातील उद्योग उभारणी करीता असलेले शासकीय योजना, सोयी–सुविधा, सवलती, प्रणाली बाबत माहिती व मार्गदर्शन, उद्योग व्यवस्थापन, विपणन व्यवस्थापन, आयात निर्यात तसेच उद्योग उभारणीतील येणाऱ्या अडचणी व निराकरण यावर माहिती दिली जाणार आहे.

या कार्यशाळेतील प्रशिक्षणार्थींना सहभागी झाल्याचे शासकीय प्रमाणपत्र दिले जाणार आहे. या प्रशिक्षणात सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी अधिक माहिती व नाव नोंदणीसाठी रविराज भालेराव ९९६०५९९९८५, मंगेश उदबत्ते ९३७३४७३९२९ (अहमदनगर) व कल्याणी वायकर ८९९९७६९९८५ (कोपरगाव) यांच्याशी संपर्क साधण्याचे सांगण्यात आले आहे.

## डॉ. पाऊलबुधे तंत्रनिकेतन कॉलेजचा १०० टक्के निकाल

नगर – महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने घेतलेल्या परीक्षेत नगर–सोलापूर रोडवरील नारायणडोह येथील डॉ. ना.ज.पाऊलबुधे तंत्रनिकेतन कॉलेजचा निकाल १०० टक्के लागला असून यावर्षी १०० टक्के निकालाची परंपरा महाविद्यालयाने कायम राखली आहे. यामध्ये संगणक इंजिनिअरिंग, यंत्र अभियांत्रिकी, विद्युत विभागाच्या अंतिम वर्षाच्या निकालामध्ये विद्यार्थ्यांनी चांगले गुण मिळवून कॉलेज चे नाव उज्वल केले आहे.

अंतिम वर्षाच्या संगणक विभागात ओंकार साठे ९३% गुण मिळवून प्रथम आला तर वैष्णवी साठे ही ९० टक्के गुण मिळवून दुसरी आली. यंत्र अभियांत्रिकीच्या अंतिम वर्षे निकालामध्ये निखिल गांगुर्डे ७२ टक्के गुण मिळवून प्रथम आला तर ऋत्विक वाघुले ने ७० टक्के गुण मिळवून दुसरा क्रमांक पटकाविला.

विद्युत विभागामध्ये विशाल डाके ६६% गुण मिळवून प्रथम तर गणेश विटकर ६२% गुण मिळवून दुसरा आला. स्थापत्य विभागात सार्थक मुसळे ७६ टक्के गुण मिळवून प्रथम तर विक्रम दळवी ६९ टक्के गुण मिळवून द्वितीय आला.

प्रथम वर्ष कॉम्प्युटर इंजिनिअरिंग मध्ये वैष्णवी इंगळे प्रथम क्रमांक तर कृष्णा रंगाटे ९०% गुण मिळवून द्वितीय आला. प्रथम वर्ष मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागात श्रेयस कल्याणनम ७८ टक्के गुण मिळवून प्रथम आला तर भास्कर दासरी ७६ टक्के गुण मिळवून दुसरा आला. प्रथम वर्ष विद्युत अभियांत्रिकी विभागात प्रज्योत दांडगे ८६ टक्के गुण मिळवून प्रथम तर ओवेल दिवे ८२ टक्के गुण मिळवून द्वितीय आला. प्रथम वर्ष सिव्हील इंजीनिअर विभागात विश्वजित पवार ८१ टक्के गुण मिळवून प्रथम तर सुप्रिया बाबर ७८% गुण मिळवून द्वितीय आली.

या सर्व विद्यार्थ्यांचे सेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष विनय पाऊलबुधे, सदस्य साई पाऊलबुधे, प्राचार्य बाळासाहेब बोर्डे, अध्यापक, अध्यापिका, कर्मचारीवृंद आदींनी अभिनंदन केले आहे.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना मेकॅनिकल विभाग प्रमुख जाबीर अली, संगणक विभाग प्रमुख श्रीकांत गागरे, विद्युत विभाग प्रमुख निलेश निर्मळ, सिव्हिल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख श्रीमती जयश्री होले, श्रीमती रेखा रोटे आदींचे मार्गदर्शन लाभले.


## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ट वर्णन केलेल्या शॉप मिळकती ही विद्यमान मालक १. जया सुरेश भाटिया, २. शामकुमार गुलझारीलाल गुलाटी, ३. मनोज गुलझारीलाल गुलाटी व ४. अमिता उर्फ निकिता ईश्वर जवरानी सर्व रा. महात्मा गांधी रोड, अहमदनगर यांचे मालकी वहीवाटीची आहे. सदर शॉप मिळकती त्यांच्या प्रत्यक्ष कब्जात आहे. खाली नमुद केलेल्या शॉप मिळकतीचा विक्रीचा व्यवहार आमच्या आशिलाबरोबर ठरला असून सदर शॉप मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजाविरहित आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहिर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद शॉप मिळकती बाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन सात (७) दिवसाचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांच्या नकलासह आम्हांस कळवावे व पुराव्यासह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीव पूर्वक सोडून दिलेले आहे असे समजून आमचे आशिल खरेदीचा व्यवहार करतील व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन :-**

अ) डि।। अहमदनगर सब डि।। ता. नगर पैकी अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अहमदनगर यांचे कार्यक्षेत्रातील मौजे शहर नगर येथील नगर भूमापन क्रं. २७३५/४ याचे एकुण क्षेत्र २४.१० चौ. मी. हे संपूर्ण क्षेत्र व यावरील शॉप मिळकती.

यांसी चतु:सिमा :-
पुर्वेस – गल्ली व सि. स. नं. २७३२ पैकी, दक्षिणेस – सि. स. नं. २७३५ पैकी,
पश्चिमेस – एम. जी. रोड, उत्तरेस – सि. स. नं. २७३५ पैकी,

ब) डि।। ता. नगर पैकी अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अहमदनगर यांचे कार्यक्षेत्रातील मौजे शहर नगर येथील नगर भूमापन क्रं. २७३२/१४/अ याचे एकुण क्षेत्र १७.४२ चौ. मी. हे संपूर्ण क्षेत्र.

यांसी चतु:सिमा :-
पुर्वेस – गल्ली व सि. स. नं. २७३२ पैकी दक्षिणेस – सि. स. नं. २७३२ पैकी,
पश्चिमेस – सि. स. नं. २७३५/४, उत्तरेस – सि. स. नं. २७३२ पैकी,

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकत दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुध्दा व इतर वागणुक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकत.

अहमदनगर
दिनांक :– ०४/०७/२०२४

**ॲड. सुनिल गोरक्षनाथ हरीश्चंद्रे**
**ॲड. ओंकार पंडीत मोरे**
मो नं. ९८६०६४६४६३,
ऑफिस– महालक्ष्मी चेंबर्स, मोरया मंगल कार्यालयासमोर, पाईपलाईन रोड, सावेडी, अहमदनगर



## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिरिष्ट वर्णन केलेली प्लॉट व त्यावरील बांधकाम हि मिळकत विद्यमान मालक **नेहा विवेक खिरे उर्फ सुचेता शशिकांत बेळंबे रा. प्लॉट नं. २४, सहकार नगर सावेडी अहमदनगर** यांची आहे तरी सदर जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविण्यात येते की सदर प्लॉट व त्यावरील बांधकाम या मिळकती बाबत कोणतेही साठेखत, खरेदीखत, गहाणखत,इक्वीटेबल मॉरगेज, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन **सात (७)** दिवसाचे आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्या सह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर प्लॉट व त्यावरील बांधकाम ही मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे समजले जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन :-** डि।। अहमदनगर सब डि।। व तालुका नगरपैकी अ.नगर महानगरपालिका हददीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अ.नगर यांचे कार्यक्षेत्रातील मौजे **सावेडी येथील सर्व्हे नं. २७/१अ मधील प्लॉट नं. २४ याचे क्षेत्र १८६.०० चौ.मी. यावर १९८७ साली लोडबेअरिंग मध्ये केलेली घरमिळकत यात पाच रुम संडास बाथरुम याचे एकुण बांधकाम क्षेत्र ८७.६२ चौ.मी. या मिळकतीबाबत.**

**यांसी चतु:सीमा -**
पूर्वेस : प्लॉट नं. २३ दक्षिणेस : प्लॉट नं. १९ व २०
पश्चिमेस : प्लॉट नं. २५ उत्तरेस : ९ मीटर रस्ता

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक प्लॉट व त्यावरील बांधकाम ही मिळकत दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुध्दा व इतर वागणुक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकत.

अहमदनगर
दिनांक :– ०४/०७/२०२४

**ॲड. अभिजीत बाळासाहेब आवारी**
ऑफीस नं. २, तळमजला, पराग बिल्डींग, जिल्हाधिकारी कार्यालयाशेजारी अहमदनगर
मो नं. ९८८१२७१२२४,


## महात्मा फुलेंनी बहुजनांसाठी शिक्षणाची द्वारे खुली केली

**प्रा.माणिक विधाते यांचे प्रतिपादन; ३ जुलै रोजी १८५१ बहुजनांसाठी पहिली शाळा सुरु, सकल माळी समाजातर्फे ऐतिहासिक दिन साजरा**

नगर – स्वातंत्र्यपूर्व काळात मुलींना शिक्षण देणे जिकीरीचे झाले असल्याने महात्मा फुले यांनी स्वतः च्या धर्म पत्नीला शिक्षण दिले. ३ ऑगस्ट १९४८ रोजी पहिली मुलींची शाळा भिडे वाडा पुणे येथे सुरू केली. त्यानंतर ३ जुलै १८५१ रोजी सर्व समाजातील बहुजन लोकांसाठी महात्मा फुले यांनी शाळा सुरू करुन बहुजनांसाठी शिक्षणाची द्वारे खुली केली.हा ऐतिहासिक दिन नगर शहरात सकल माळी समाज ट्रस्टच्या वतीने साजरा करण्यात आला आहे, असे प्रतिपादन प्रा.माणिक विधाते यांनी केले आहे.



महात्मा फुलेंनी बहुजनांसाठी शाळा सुरू केली हा ऐतिहासिक दिन सकल माळी समाजाचे वतीने साजरा करण्यात आला. याप्रसंगी महात्मा फुले यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

३ जुलै १८५१ रोजी थोर समाज सुधारक महात्मा फुले यांनी बहुजनांसाठी पहिली शाळा सुरु केली. नगरमध्ये हा ऐतिहासिक दिन सकल माळी समाज ट्रस्टच्या वतीने साजरा करण्यात आला. माळीवाडा येथील महात्मा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी सकल माळी समाज ट्रस्टचे अध्यक्ष किशोर डागवाले, उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, माजी नगरसेवक बाळासाहेब बोराटे, प्रा.माणिक विधाते, सचिव राजेंद्र पडोळे, कोअर कमिटी सदस्य अनिल इवळे, अमोल भांबरकर, संजय गारुडकर, चंद्रकांत पुंड, रोहित पठारे, लवेश गोंधळे, मच्छिंद्र बनकर, भानुदास बनकर, सुधाकर कानडे, संजय कानडे, गणेश कोल्हे, भाऊसाहेब कोल्हे, कुंडलिक गदादे, रमेश रडे, बाळासाहेब इवळे, सौ.रोहिणी बनकर आदी उपस्थित होते.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# धम्माल मनोरंजन

## सुविचार



जनसमूहाची वृत्ती सत्यापेक्षा अफवेवर विश्वास ठेवण्याकडे असते.

## दिनविशेष ०५जुलै २०२४

१८८२ : 'हजरत इनायत खाँ' – हिन्दुस्थानी शास्त्रीय गायक यांचा जन्म. (मृत्यू: ५ फेब्रुवारी १९२७)

१९१८ : केंद्रीय उद्योगमंत्री आणि केरळचे मुख्यमंत्री के. करुणारन यांचा जन्म. (मृत्यू: २३ डिसेंबर २०१०)

१९२० : 'आनंद साधले' – साहित्यिक यांचा जन्म. (मृत्यू : ४ एप्रिल १९९६)

१९२५ : 'नवल किशोर शर्मा' – केंद्रीय मंत्री आणि गुजरातचे राज्यपाल यांचा जन्म. (मृत्यू: ८ ऑक्टोबर २०१२)

१९४६ : 'रामविलास पासवान' – केंद्रीय मंत्री यांचा जन्म.

१९५२ : 'रेणू सलुजा' – चार वेळा राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या चित्रपट संकलक यांचा जन्म. (मृत्यू: १६ ऑगस्ट २०००)

१९५४ : 'जॉन राइट' – न्यूझीलंडचे क्रिकेटपटू आणि प्रशिक्षक यांचा जन्म.

१९६० : 'राकेश झुनझुनवाला' – भारतीय उद्योगपती यांचा जन्म.

१९६८ : 'सुसान वॉजिकी' – युट्युब चे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा जन्म.

१९७३ : 'गीता कपूर' – भारतीय नृत्यदिग्दर्शक यांचा जन्म.

१९९५ : 'पुसारला वेंकट सिंधू' – भारतीय बॅडमिंटनपटू यांचा जन्म.

वरीलप्रमाणे ५ जुलै दिनविशेष ५ क्षींश्रू वळर्पीळीहशीह

५ जुलै दिनविशेष – मृत्यू :

१८२६ : 'सर थॉमस स्टॅम्फोर्ड रॅफल्स' – सिंगापूरचे संस्थापक यांचे निधन. (जन्म: ६ जुलै १७८१)

१८३३ : 'निकेफोरे निओपे' – जगातील पहिले परिचित असलेला फोटो काढणारे यांचे निधन. (जन्म: ७ मार्च १७६५)

१९४५ : 'जॉन कर्टिन' – ऑस्ट्रेलियाचे १४ वे पंतप्रधान यांचे निधन.

१९५७ : 'अनुग्रह नारायण सिन्हा' – भारतीय वकील आणि राजकारणी यांचे निधन. (जन्म: १८ जून १८८७)

१९९६ : 'बाबूराव अर्नाळकर' – रहस्यकथाकार यांचे निधन.

२००५ : 'बाळू गुप्ते' – लेगस्पिन गोलंदाज यांचे निधन. (जन्म: ३० ऑगस्ट १९३४)

२००६ : 'थिरुल्लालु करुणाकरन' – भारतीय कवी आणि विद्वान यांचे निधन. (जन्म: ८ ऑक्टोबर १९२४)

## आरोग्य

### दमा (श्वास रोग)

१. समुद्री कासवाचे तेल ५ थेंब घेऊन सकाळी पाण्याबरोबर ३ दिवस घेतल्याने या रोगात आराम येतो.

२. एक चांगले केळे घेऊन त्याचे साल न काढता त्यात भोक करावे. त्या भोकात से सेंधा मीठ आणि काळी मिरीची चूर्ण भरुन चांदण्या रात्रीत रात्रभर ठेवावे. सकाळी त्याला आगीत शेकून खावे.

शरद पौर्णिमेच्या रात्री ठेवलेले केळे दुसऱ्या दिवशी खाल्याने विशेष फायदा होतो.

३. अखंड इसबगोल घ्यावा. त्याचा सत किंवा भूसा नको. याला साफ करुन सकाळ– संध्याकाळ १०–१० ग्रॅम इसबगोल पाण्याबरोबर गिळावे. एका महिन्यात आराम येतो. पश्चात तांदूळ, तळण, तेल, आंबट, वातूळ पदार्थ घेऊ नये. बरे झाल्यानंतर ही सहा महिने पथ्य पाळावे.

## टिप्स

■ केकचे मिश्रण घोटताना कमी वेळ लागावा म्हणून घोटण्यास घेतलेले भांडे थोडे गरम करा व मग वापरा. मिश्रण चटकन फेसाळले जाऊन हलकेही होईल.

■ आइस्क्रीम किंवा केक करताना ॲल्युमिनियमचे भांडे वापरल्यास दोन्ही उत्तम होतात. दोन्ही पदार्थ भांड्याला चिकटत नाहीत.

■ कोकम सरबत जुने झाले असल्यास त्याच्यात पाणी घालून व नारळाचे दूध घालून कोकमाचे सार बनविता येते. त्यात नेहमीप्रमाणे कढीलिंब, मिरची, नारळाचे दूध, हिंग– जिऱ्याची फोडणी घालून सार अगदी ताज्या कोकमाच्या साराप्रमाणे गुलाबी रंगाचे होते व अगदी झटपट तयार होते.

## रुचिदा




### नाचणीच्या पिठाची बर्फी

**साहित्यः** १ वाटी नाचणीचे पीठ, १ वाटी दूध, २ वाटी साखर, दीड वाटी साजूक तूप, वेलची पूड, काजू, बदाम.

**कृतीः** एका कढईत नाचणीचे पीठ, दूध, तूप व साखर एकत्र करुन शिजव ठेवावे.

घट्ट गोळा होईपर्यंत ढवळत राहावे. मिश्रण एकजीव झाल्यावर वेलची पूड घालावी. व ट्रेमध्ये घालून थापावे. वरुन बदाम काजूचे तुकडे घालावे. पौष्टिक बर्फी तयार झाली.

## शब्दरंजन




### आडवे संकेत

१) खजिना
४) वतनदार
८) साल, वर्ष
१०) गुळ करण्याची मोठी कढई
११) मध्यम प्रतिचा
१२) लहान किल्ला
१३) एक काटेरी औषधोपयोगी वनस्पती १५) नि:संकोच रितीने
१७) दुश्मन
१८) काळ्या बिया असलेले एक मोठे फळ
२१) पत्रा कापताना वापरतात तो खिळा
२२) भरुन काढणारी गोष्ट
२४) गळालेले अक्षर वर लिहिताना करतात ती खूण
२५) युद्ध
२६) पाच बोटांपैकी सर्वात लहान बोट
२८) अकस्मात ३०) नक्र, सुसर
३१) गवळ्यांचे गाव
३२) औषधविक्रेता
३३) वडील ३४) मस्ती
३५) चंचल, तरळ
३६) तांदुळाची लाही
३७) विद्युल्लता ३९) मिंधा
४२) नवीन जन्मलेला
४५) खाली असलेला
४६) सामान, सामग्री
४८) जर्दा, घट्ट, दाट
४९) पांघरण्याचे क साधन
५१) आरामशीर
५३) मिलाप, योग
५४) तऱ्हा, पद्धत

### उभे संकेत


१) एक थंड पेय
२) पोवाडा म्हणणारा
३) गालाच्या आजूबाजूचा भाग
४) कारण, सबब
५) पाण्यातील एक मासा
६) लगेच, त्वरित ७) माजलेला
९) टिळकांचे वृत्तपत्र
१४) आरोळी
१६) हॉटेलमधील एक खाद्य
१७) ढोरांचा चारा
१९) कोरे पुस्तक (इं.)
२०) सांभाळ, काळजी घे
२२) रामाची व भरताची ही फार प्रसिद्ध आहे.
२३) हुशार, तरबेज
२६) रोड, अशक्त
२७) फणसाचा मध्य
२८) अव्वाच्या सव्वा भावाचा
२९) जीवन असेपर्यंत
३१) गणपती
३४) चोप, ताडन
३६) मध्यप्रदेशातील प्रसिद्ध शहर
३८) लोकमत
४०) एका संख्येत दुसरी संख्या मिळविणे ४१) रंगहीन
४३) बिछाईत४४) चंचलता
४७) तोफ डागण्याची बत्ती
४९) घेतलेली सुटी
५०) ईडा, पिडा ५२) तकहुब






- घटना तयार होण्यासाठी किती कालावधी लागला?– **२ वर्षे ११ महिने १८ दिवस.**
- सुरुवातीला भारतीय घटनेत एकूण कलमे– **३९५ होती**
- भारतातील पहिल्या सार्वत्रिक निवडणुका केव्हा झाल्या?– **१९५२**
- जगातील सर्वात मोठी घटना कोणत्या देशाची आहे?– **भारत**
- भारतीय घटनेत मान्य केलेले मूलभूत हक्क किती?– **६(सहा)**
- भारतीय घटनेत मान्य केलेले मूलभूत कर्तव्य किती आहेत? – **१०(दहा)**
- भारताने संसदीय शासनपद्धती कोणत्या देशाकडून घेतली?– **इंग्लंड.**
- भारताने घटनादुरुस्ती कोणत्या देशाकडून घेतली? – **दक्षिण आफ्रिका.**
- भारताने मार्गदर्शक तत्त्वे कोणत्या देशाकडून घेतली?– **आयर्लंड.**
- लोकसभेत जास्तीत जास्त सभासदांची संख्या किती ठरविण्यात आली आहे?– **५५२**
- लोकसभेचा कार्यकाल किती वर्षांचा असतो?– **५ वर्षे**
- सध्या लोकसभेत किती लोकसंख्या आहे?– **५४५**
- महाराष्ट्रातून लोकसभेवर किती उमेदवार निवडून पाठविले जातात? – **४८**
- लोकसभेची निवडणूक दरवर्षी किती वर्षांनी होते?– **५ वर्षे**
- लोकसभेचा सभासद आपला राजीनामा कोणाकडे देतात? – **लोकसभा सभापती.**
- लोकसभेचे पहिले सभापती कोण?– **गणेश वासुदेव माळवणकर**
- राज्यसभेचा कार्यकाल किती वर्षाचा आहे?– **कायमस्वरुपी सभागृह.**
- महाराष्ट्रातून राज्यसभेवर किती सभासद पाठविले जातात? – **१९.**
- राज्यसभेवर किती सदस्यांची नेमणूक राष्ट्रपती करतात? – **बारा (१२).**
- राज्यसभेच्या सदस्याचा कार्यकाल किती वर्षांचा असतो? – **६ वर्षे.**
- राज्यसभेच्या उमेदवारासाठी किती वर्षे पूर्ण झालेली असावी लागतात?– **३० वर्षे.**
- लोकसभेच्या उमेदवारासाठी किती वर्षे पूर्ण झालेली असावी लागतात?– **२५ वर्षे.**
- राज्यसभा लोकसभेचे संयुक्त अधिवेशन कोण बोलविते? – **राष्ट्रपती.**
- भारताचे पहिले राष्ट्रपती कोण?– **डॉ. राजेंद्रप्रसाद.**
- राष्ट्रपतीच्या उमेदवारासाठी वयाची किती वर्षे पूर्ण असावी लागतात?– **३५ वर्षे.**
- राष्ट्रपतीचा कार्यकाल किती वर्षांचा असतो?– **५ वर्षे.**
- राष्ट्रपतीला कोण शपथ देते?– **सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश.**
- भारताचा प्रथम नागरिक कोण असतो?– **राष्ट्रपती.**
- पंतप्रधानाची नेमणूक कोण करतो?– **राष्ट्रपती.**
- भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती कोण?– **प्रतिभा पाटील.**
- राष्ट्रपती आपला राजीनामा कोणाकडे देतो?– **उपराष्ट्रपती.**
- भारताच्या तिन्ही दलाचे प्रमुख कोण असतात?– **राष्ट्रपती.**
- उपराष्ट्रपती आपला राजीनामा कोणाकडे देतो?– **राष्ट्रपती.**
- भारताचे पहिले उपराष्ट्रपती कोण?– **डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन.**
- लोकसभेत धनविधेयक मांडताना कोणाची परवानगी आवश्यक असते?– **राष्ट्रपती.**
- विधानसभा विसर्जित करण्याचा अधिकार कोणाला आहे? – **राज्यपाल.**
- विधानसभेत एका वर्षात किती अधिवेशन होतात?– **२ (दोन)**
- मंत्रिमंडळ संयुक्तरित्या कोणाला जबाबदार असते? – **लोकसभेला.**
- घटक राज्यांचा प्रमुख कोण असतो?– **राज्यपाल.**
- राज्यपालांची नेमणूक कोण करते?– **राष्ट्रपती.**
- राज्यपालाचा कार्यकाल किती वर्षाचा असतो?– **५ वर्षे.**

## फिल्मीरंजन






### आडवे संकेत

१) सन् १९९९ में ऋषी कपूर निर्देशित इस फिल्म में अक्षय खन्ना और ऐश्वर्या रॉय थे.
४) एक मशहूर खलनायक, हास्य अभिनेता और संवाद लेखक.
६) दिल दे चुके सनम (फिल्म)७) इरादे (फिल्म)
८) सन् २००० में धर्मेश दर्शन निर्देशित इस फिल्म में आमिर खान और ट्विंकल खन्ना थे.
९) चुपके चुपके (फिल्म)
११) तन (फिल्म)
१२) सन् १९९२ में बनी बलवान फिल्म की नायीका.
१३) सन् १९९७ में सोहेल खान निर्देशित इस फिल्म में संजय कपूर, शिल्पा शेट्टी और सलमान खान थे.
१५) सन् १९९८ में एन. चंद्रा निर्देशित इस फिल्म में मुकुल देव और माधूरी दीक्षीत थे.
१७) सन् १९८९ में के. विश्वनाथ निर्देशित इस फिल्म में अनिल कपूर और विजया शांती थे.
१९) मुझे कुछ है (फिल्म)
२०) मेरे हाथों में नौ नौ चुडिया है थोडा ठहरो सजन.... इस गाणे की फिल्म.२१) ससुराल (फिल्म)
२२) विवेक ओबेरॉय, मुकेश ऋषी और अतुल कुलकर्णी की एक फिल्म. २३) पाप का (फिल्म)
२४) सन् १९९८ में नरेश मल्होत्रा निर्देशित इस फिल्म में गोविंदा और मनिषा कोईराला थे.
२६) दे दे प्यार दे प्यार दे प्यार दे रे प्यार हमे प्यार दे.... यह गाना इस फिल्म का है.२७)सुनिल शेटटी ,अक्षय कुमार की फ़िल्म
२८) चोर मचाऐ (फिल्म)
२९) तेरा चल गया (फिल्म)
३०) कयामत से कयामत (फिल्म)३१) एक एक ग्यारह (फिल्म)
३२) सन् १९९४ में सिकंदर भारती के निर्देशन में बनी इस फिल्म में अक्षय कुमार और मधू थे.

### उभे संकेत

१) सन् १९९९ में बनी मस्त फिल्म का नायक.
२) मै (फिल्म)
३) सन् २००० में डेविड धवन निर्देशित इस फिल्म में संजय दत्त, करिश्मा कपूर और सलमान खान थे. ४) राकेश रोशन, जयाप्रदा, डॉ. श्रीराम लागू और सुजीत कुमार अभिनीत फिल्म.
५) दिवाना मुझसा (फिल्म)
१०) सपनों में आना दिल में समाना प्यार क्या है तुम मुझे बताना..... यह गाना इस फिल्म का है.
१४) सन् १९९१ में बनी फुल बने अंगारे फिल्म का नायक.
१६) सन् २००१ में कल्पना लाजमी के निर्देशन में बनी इस फिल्म में सयाजी शिंदे और रविना टंडन थे.
१७) सन् १९८७ में ज्योतीन गोयल निर्देशित इस फिल्म में संजय दत्त और मिनाक्षी शेषांद्री थे.
१८) सन् १९७५ में बनी इस फिल्म में धर्मेंद्र, अमिताभ बच्चन, हेमा मालिनी, संजीव कुमार और अमजद खान थे.
१९) जीना सिर्फ मेरे लिए फिल्म की नायीका.
२३) रोड फिल्म की नायीका.
२४) सन् १९९४ में राज सिप्पी निर्देशित इस फिल्म में संजय दत्त और अक्षय कुमार थे.
२५) सन् १९९२ में अजीज सेजावल निर्देशित इस फिल्म में संजय दत्त, अनिता राज और शत्रूघ्न सिन्हा थे.






नगर-कल्याण रोडवरील सीना नदीच्या पुलाचे काम सुरु असल्याने मोठ्या प्रमाणात या रस्त्यावरुन सुरु असलेल्या अवजड वाहनांच्या वाहतूकीमुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे.

# वाहतूक कोंडीने नागरिक वैतागले, अपघाताचे प्रमाण वाढले

**पुलाचे काम सुरु असल्याने अवजड वाहतूक बाह्यवळण रस्त्याने वळवा**

नगर - नगर-कल्याण रोडवरील सीना नदीच्या पुलाचे काम सुरु असल्याने मोठ्या प्रमाणात या रस्त्यावरुन सुरु असलेली अवजड वाहतुक बाह्यवळण रस्त्याने वळविण्याची मागणी भाजपचे शहर सचिव दत्ता गाडळकर यांनी केली आहे. अवजड वाहनांमुळे अनेक लहान-मोठे अपघात घडत असून, वाहतुक कोंडीचा त्रास या भागातील नागरिकांना सहन करावा लागत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

नगर-कल्याण रोडवरील सीना नदीच्या पुलाचे काम हाती घेतल्याने पर्यायी रस्त्यावर छोटे पुल उभारुन वाहतुक वळविण्यात आली आहे. मात्र हा पुल अत्यंत अरुंद असून, या पुलावर अवजड वाहन आल्यास मोठ्या प्रमाणात वाहतुक कोंडी होते. सध्या शाळा, महाविद्यालय सुरु झाले असून विद्यार्थी, महिलांना जीव मुठीत धरुन या रस्त्यावरुन प्रवास करावा लागत आहे. शहराला जोडणारा हा प्रमुख रस्ता असून, अवजड वाहनामुळे वाहतुक कोंडी नित्याचीच बाब झाली आहे. नागरिकांच्या सोयी व सुरक्षेसाठी नगर-कल्याण मार्गे शहरात येणारी अवजड वाहतुक बाह्यवळण रस्त्याने वळविण्याची मागणी गाडळकर यांनी केली आहे.

नगर-कल्याण रोडवरील सीना नदीच्या पुलाचे काम पूर्ण होत नाही, तो पर्यंत अवजड वाहने शहरात येऊ देऊ नये. अवजड वाहनामुळे सीना नदीच्या पुलावर केलेल्या पर्यायी रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतुक कोंडी होत आहे. तर अनेक अपघात घडत असून, परिसरातील विद्यार्थी, पालक व महिला या रस्त्यावरुन जाण्यासही घाबरत आहे. नागरिकांना शहरात येण्यासाठी याच रस्त्यावरुन जावे लागत असल्याने वाहतुक कोंडी व अपघात टाळण्यासाठी अवजड वाहतुक बाह्यवळण रस्त्याने वळवावी, असे दत्ता गाडळकर यांनी म्हटले आहे.

# नगरला शिस्तप्रिय व भ्रष्टाचारविरहित आयुक्ताची नियुक्ती करण्यात यावी



भगवान फुलसौंदर

नगर - नगरला शिस्तप्रिय व भ्रष्टाचारविरहित आयुक्ताची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी माजी महापौर भगवान फुलसौंदर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, नगरला महापालिका दर्जा मिळाल्यानंतर महानगर होण्याच्या दृष्टिने राज्य शासनाने आवश्यक त्या निधीसह कणखर आयुक्त देणे गरजेचे होते व आजही आहे. मी प्रथम महापौर झाल्यानंतर शहर विकासाचे ध्येय बाळगुन स्व. अनिल राठोड व सर्व पक्षीय सहकार्याने मी प्रामाणिकपणे प्रयत्न केले होते. आजही शहराच्या किमान मुलभुत गरजा, सेवासुविधा या सुरळीत नाहीत. भ्रष्टाचार हा शिष्टाचार बनला असून नगरची जनताही हवालदिल झालेली आहे. तरी अशा परिस्थितीमध्ये महानगरपालिकेचे प्रशासन व्यवस्थित व परिणामकारकरित्या चालविण्यासाठी नगरला कडक शिस्तीच्या व भ्रष्टाचाराचा डाग नसलेले आयुक्त येणे अनिवार्य आहे.

विशेषतः उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नगर जिल्ह्याचे त्यांच्या पक्षाचे पालकत्व घेतले असल्याने त्यांनी नगरसाठी लक्ष देऊन परिणामदायी निर्णय द्यावेत अशी मागणी भगवान फुलसौंदर यांनी केली आहे.

नगरची वाढती ताबेमारी, गुंडगिरी, तरुणामध्ये नशेचे वाढते प्रमाण, वाहतुक समस्या, रोजगार निर्मिती, दादागिरी, दहशत या समस्यांच्या निराकरणासाठी व विज, पाणी, रस्ते या मुलभुत सेवा सुविधांच्या निराकरणासाठी सक्षम प्रशासनासाठी तुकाराम मुंढेसारखा कणखर व कडक शिस्तीचा किंवा आय. ए. एस. दर्जाचे आयुक्त नगर महानगरपालिकेला देण्याची मागणी त्यांनी केली आहे.

# महाराष्ट्र स्वाभिमान गौरव पुरस्काराने संगिता घोडके यांचा मुंबईत सन्मान



नगर - जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षिका संगिता घोडके यांना शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात सुरु असलेल्या कार्याबद्दल मुंबईत महाराष्ट्र स्वाभिमान गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. जय महाराष्ट्र पत्रकार वृत्तपत्र लेखक व कवी महासंघाच्या वतीने आझाद मैदान येथील पत्रकार भवनात ३५० व्या शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त झालेल्या कार्यक्रमात राजमाता जिजाऊ (लखुजी जाधवराव) यांचे सोळावे वंशज श्रीमंत संभाजीराजे जाधव यांच्या हस्ते घोडके यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या पुरस्कार सोहळ्यासाठी मराठा समन्वय परिषदेच्या राज्य कार्याध्यक्षा अनिता काळे, उद्योजिका संगिताताई गुरव, मॉडेल स्मिता भोसले-धुमाळ, मुंबई महापालिकेचे माजी महापौर महादेव देवळे, सुभाष गायकवाड, तेजस्विनी गलांडे, स्वागिताध्यक्ष देवानंद कांबळे, महासंघाचे अध्यक्ष प्रकाश जाधव, सचिव सुरज भोईर आदी उपस्थित होते.

संगिता घोडके कापूरवाडी जिल्हा परिषद शाळेत शिक्षिका असून, महाराष्ट्र राज्य उच्चशिक्षित एम.एड कृती समिती महिला आघाडीच्या अध्यक्षा म्हणून काम पाहत आहे. त्यांचे शैक्षणिक क्षेत्रासह सामाजिक कार्यात योगदान सुरु असून, शिक्षकांच्या प्रश्नावर देखील ते कार्य करत आहे. समाजातील गरजू विद्यार्थी व महिलांना ते नेहमीच आधार देण्याचा काम करत असतात. अनेक विद्यार्थ्यांना त्यांनी घडवले असून, त्या आज उच्च पदावर कार्यरत आहे. शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना महाराष्ट्र स्वाभिमान गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.



संतश्रेष्ठ श्री निवृत्तीनाथांच्या पायी दिंडीचे मार्केट यार्ड येथे स्वागत करताना अहमदनगर मर्चन्टस् बँकेचे स्टाफ डायरेक्टर प्रसाद गांधी.

# पायी दिंडी सोहळ्यातील वारकरी हे विठ्ठलाचेच रूप

**मर्चन्टस् बँकेचे स्टाफ डायरेक्टर प्रसाद गांधी**

नगर - पंढरीचा आषाढी वारी पायी सोहळा हे महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभव आहे. आषाढी वारीसाठी नगर शहरामधून पंढरपूरला जाणाऱ्या पायी दिंडीमधील वारकरी बंधू-भगिनींची सेवा करण्यासाठी पूर्वसुकृतच लागते. वारकऱ्यांमध्ये विठ्ठलास पाहिले जाते. पायी वारीतील वारकरी हे विठ्ठलाचेच रूप आहेत, असे प्रतिपादन मर्चन्टस् बँकेचे स्टाफ डायरेक्टर प्रसाद गांधी यांनी केले.

संतश्रेष्ठ श्रीनिवृत्तीनाथांचा पायी पालखी सोहळा नगर शहरातील मार्केट यार्ड येथे मुक्कामी होता. श्रीनिवृत्तीनाथांचा संजीवन समाधी सोहळा भक्तिपूर्ण वातावरणात येथे पार पडल्यावर सकाळी उत्साहात पंढरपूरकडे प्रस्थान होत असताना मर्चन्टस् बँकेच्या कर्मचाऱ्यांकडून दिंडीतील सर्व वारकरी बंधू-भगिनींना सुवासिक खोबरेल तेल आणि उच्च प्रतीचे बिस्कीट ही अनोखी भेट देण्यात आली. तेव्हा ते बोलत होते.

मर्चन्टस् बँकेचे स्टाफ डायरेक्टर जितेंद्र बोरा दिंडीतील मानकऱ्यांसह वारकऱ्यांचे स्वागत करताना म्हणाले, मर्चन्टस् बँक खातेदारांची सेवा करण्यात अग्रभागी आहे. तोच सेवाभाव वारकरी बंधू-भगिनींना भेट देताना जपण्यात आला आहे, हे विशेष होय. याप्रसंगी मर्चन्टस् बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुनिल पुराणिक, उप मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन भंडारी, असिस्टंट मॅनेजर सुनिल गुगळे यांच्यासह शहरातील मर्चन्टस् बँकेच्या सर्व शाखांचे कर्मचारी श्रध्देने उपस्थित होते.

प्रसाद गांधी पुढे म्हणाले, मर्चन्टस् बँकेच्या मार्केट यार्ड येथील मुख्य शाखेसमोरच असलेल्या हनुमानजींच्या मंदिर प्रांगणात परंपरेप्रमाणे संतश्रेष्ठ श्रीनिवृत्तीनाथांचा पायी पालखी सोहळा मुक्कामी असतो. हे लक्षात घेऊन बँकेच्या कर्मचारी वृंदांनी एकत्रित येऊन वारकरी बंधू-भगिनींना उपयुक्त भेट देण्याचे नियोजन केले. पांडुरंगानेच त्यांच्याकडून ही सेवा करवून घेतली. याकरिता बँकेच्या चेअरमन, व्हाईस चेअरमनसह संचालक मंडळाचे मोलाचे सहकार्य लाभले. वारीच्या सेवेत सहभागी होण्याचा आनंद मर्चन्टस् बँकेला मिळाला. बँकेचे कार्य सर्व क्षेत्रात असल्याचेच हे द्योतक आहे.

वारकरी पंढरपूरकडे प्रस्थान करत असताना त्यांच्या हाती आपली भेट देऊन चार पावले चालत निरोप देण्याचा आनंद मर्चन्टस् बँकेतील उपस्थित सर्व कर्मचारी वृंदांनी घेतला. टाळ-मृदुंगाच्या साथीसह निवृत्तीनाथ आणि ज्ञानोबा माऊलीच्या गजराने वातावरण दुमदुमून गेले.


# माजी नगरसेवकाच्या मुलास हातपाय बांधून मारहाण केल्याच्या खटल्यातून निर्दोष मुक्त

नगर - माजी नगरसेवकाच्या मुलास हातपाय बांधून मारहाण केल्याच्या खटल्यातून सर्व आरोपींची न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली आहे.

०२/१०/२०१७ रोजी फिर्यादी यांचा मुलगा घराबाहेर उभा असतांना दुपारी ४.३० चे सुमारास आरोपी शहाबाज शेख व शोहेब शेख हे त्याच्या जवळ जाऊन त्याला ५ मिनीटात येऊ असे म्हणून मोटारसायकलवर बसवुन मुकुंदनगर गोविंदपुरा भागातील जिल्हा परिषद शाळेच्या झाडा झुडपांत नेले तेथे अगोदरच ७-८ मुले उभी होती त्यांनी सर्वांनी फिर्यादीचे मुलाचे हाता-पायाला बांधुन, मारहाण केली व तु व तुझे वडिलांनी बाबाभाईला मागे शिवीगाळ केली आहे व मोहरमची वर्गणी दिली नाही म्हणून तुला व तुझे घरच्यांना जीवे मारु असे म्हणून फिर्यादीने मुलाचे पाठीवर, खांद्यावर, दोन्ही पायांवर लाकडी दांडक्यांनी मारहाण केली. त्याचा गळा दाबला व मोबाईल हिसकावून घेऊन जमीनीवर आपटून त्याचे नुकसान केले. अशा आशयाची फिर्याद भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन येथे शेख शोहेब, शेख शहाबाज व अनोळखी ७-८ इसमांविरुध्द भा.द.वि.क. ३२४, ३२३, १४३, १४७, १४९, ३२७, ३८४, ३८५, ३८६, ३८७ व मु.पो. कायदा कलम ३७ (१) ३, १३५ प्रमाणे गुन्हा दाखल झाली होती. त्यात पोलीसांनी सखोल तपास करुन आरोपी विरुध्द कोर्टात चार्जशिट दाखल केले. सदर केसमध्ये सरकार पक्षा तर्फे ७ साक्षीदार तपासले.

सदर साक्षीदारांच्या जबाबातली विसंगती व आरोपीचे वडीलांनी मांडलेला बचाव व युक्तीवाद मे. कोर्टाने ग्राह्य धरुन आरोपी विरुध्द सबळ पुरावा न आल्याने व फिर्यादीपक्ष आरोपी विरुद्ध केस सिध्द न करु शकल्याने कोर्टाने आरोपींची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली आहे. आरोपी तर्फे ॲड. रेणू राजेश कोठारी, ॲड. अभिजीत कोठारी व ॲड. सागर वाव्हळ यांनी काम पाहिले.

# दोन इंची पाईपलाइनचा शब्द न पाळल्याच्या निषेधार्थ जल उदंचन केंद्रास 'टाळे ठोकणार'



नगर - देहरे (ता. नगर) गावात बूस्टर जल उदंचन केंद्र उभारताना एमआयाडीसीने दोन इंची पाइपलाईन कनेक्शन देण्याचा दिलेला शब्द अद्याप पर्यन्त पाळला गेला नसल्याने व गावाची तहान भागविण्यासाठी तातडीने पाइपलाईनद्वारे कनेक्शन देण्यास टाळाटाळ केली जात असल्याच्या निषेधार्थ एमआयडीसीच्या बूस्टर जल उदंचन केंद्रास ग्रामस्थांच्या वतीने टाळे ठोकण्याचा इशारा सरपंच नंदा भगत व उपसरपंच प्रा. दिपक जाधव यांनी दिला आहे. याबाबतचे पत्र एमआयडीसीचे उप अभियंता यांना पाठविण्यात आले आहे.

देहरे येथे एमआयडीसीने बूस्टर जल उदंचन केंद्र उभारलेले आहे. हे केंद्र गावाच्या हद्दीत वन विभागाच्या जागेत उभारताना ग्रामपंचायतने एमआयडीसीला ना हरकत प्रमाणपत्र देवून गावासाठी पाइपलाइन कनेक्शन देण्याची बोलणी केली होती. यावर एमआयडीसीने त्यावेळी गावासाठी दोन इंची पाइपलाईन देण्याचा शब्द दिला होता. एमआयडीसीला देण्यात आलेल्या जागेवर ग्रामपंचायतीला गावाच्या विकासाच्या अनुषंगाने विविध योजनांच्या माध्यमातून शासकीय कार्यालय बांधकाम करावयाचे होते. तरी देखील तत्कालीन ग्रामपंचायतीने त्या जागेला नाहरकत दिली. दिलेले आश्वासनाची पूर्तता करुन एमआयडीसीने गावासाठी पाइपलाईन कनेक्शन देण्याची नैतिक जबाबदारी होती. मात्र ग्रामस्थांना पाइपलाईनचे कनेक्शन देण्यात आलेले नसल्याने मार्च २०२४ मध्ये उपसरपंच प्रा. दिपक जाधव यांच्या नेतृत्वाखाली उपोषण करण्यात आले होते.

गावात पाण्याचे मोठे संकट असून, गावातील पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी एमआयडीसीने शब्द दिलेल्या पाइपलाइनच्या कनेक्शनची गरज असल्याचे ग्रामपंचायतीच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे. ग्रामपंचायतीने एमआयडीसीकडे वारंवार लेखी व तोंडी मागणी करून देखील कनेक्शन देण्याची मागणी पूर्ण केली जात नसल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची भावना आहे. या मागणीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत आहे. यामुळे ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने थेट एमआयडीसीच्या देहरे येथील बूस्टर जल उदंचन केंद्राला टाळे ठोकण्याचा इशारा दिला आहे.

एमआयडीसीने बूस्टर जल उदंचन केंद्र उभारताना देहरे गावासाठी दिलेला दोन इंची पाइपलाईनद्वारे कनेक्शन देण्याचा दिलेला शब्द पाळावा. गावाला पाण्याची गरज असून, एमआयडीसीने आडमुठेपणाची भूमिका सोडावी. अनेकवेळा पाठपुरावा, आंदोलन, उपोषण करुन थकले असून, ग्रामस्थांच्या संयमाचा बांध फुटला आहे. ग्रामस्थ आता थेट बूस्टर जल उदंचन केंद्राला टाळे ठोकणार असल्याचे उपसरपंच प्रा. दिपक जाधव यांनी म्हटले आहे.

# शिक्षण संस्थाचालक आणि अधिकाऱ्यांच्या संगनमताने शिष्यवृत्ती योजनेत मोठा अपहार

**दोषींवर गुन्हे दाखल करून परवाने रद्द करा अन्यथा १५ जुलै रोजी उपोषणाचा इशारा**



नगर - जिल्ह्यातील अनेक संस्था चालक व समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त यांनी संगणमत करून शिष्यवृत्ती योजनेत मोठ्या प्रमाणात अपहार केल्याचा आरोप करुन सदर प्रकरणी संपूर्ण दप्तर तपासणी व्हावी व दोषींवर गुन्हे दाखल करण्याची मागणी अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने करण्यात आली आहे. याप्रकरणी कारवाई न झाल्यास समाज कल्याण आयुक्त पुणे यांच्या कार्यालयासमोर १५ जुलै रोजी उपोषण करण्याचा इशारा समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे व पारनेर तालुकाध्यक्ष निवृत्ती कासुटे यांनी दिला आहे.

जिल्ह्यातील सन २०१२-१३ ते आज अखेर नगर मधील समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्तांनी जिल्ह्यातील अनेक संस्था चालकांशी संगणमत करून अनेक विद्यार्थी बोगस दाखवून शिष्यवृत्ती योजनेत मोठ्या प्रमाणात अपहार केला आहे. कुठल्याही प्रकारे जातीचे दाखले न घेता फक्त रक्कम ही संस्था चालकांच्या खात्यावर टाकून, ती रक्कम बँकेतून काढून घेऊन संस्थाचालक व समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त यांनी संगनमताने वाटून घेतल्याचा संघटनेचा आरोप आहे.

या संदर्भात पारदर्शकपणे कोणतीही माहिती जाणीवपूर्वक दिली जात नाही. २०१२ ते आजअखेर शिष्यवृत्ती योजनेचे दप्तर तपासण्यात यावे, ज्या संस्थेच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजना दिली त्या संस्थेतील विद्यार्थ्यांची यादी तपासण्यात यावी व त्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली की नाही? याची चौकशी करण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. आमच्याकडे अनेक विद्यार्थ्यांची यादी असून, त्यांना शिष्यवृत्ती मिळाली नसल्याचे जबाब लिहून घेतले आहेत. २०१२ ते १३ या वर्षात ऑनलाईनची पद्धत अस्तित्वात नव्हती, तरी कार्यालयाच्या वतीने माहिती देण्यास टाळाटाळ केली जात असल्याचे निवेदनात म्हंटले आहे.

शिष्यवृत्ती योजनेच्या अपहाराबाबत संचालक अंमलबजावणी संचनालय (दिल्ली) यांना समाज कल्याण आयुक्त (पुणे) यांनी कारवाई करण्याचे आदेश द्यावे, समाज कल्याण आयुक्त (पुणे) यांच्याकडून संपूर्ण दप्तर तपासणी करून अपहार केलेल्या संस्था चालकांवर गुन्हे दाखल करुन त्यांचे परवाने रद्द करावे, विद्यार्थी निहाय जातीचे दाखले तपासण्यात यावे व यामध्ये दोषी असलेले समाज कल्याण सहाय्यक आयुक्त यांना बडतर्फ करण्याची मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

# बुरुडगाव रोड आयटीआय शेजारील भिंतीवर साकारली ऐतिहासिक चित्रे

**इतिहास हा समाजाला दिशादर्शक व प्रेरणा देणारा : माजी उपमहापौर गणेश भोसले यांची माहिती**



बुरुडगाव रोड आयटीआय गेट शेजारील भिंतीवर महापालिकेच्या माध्यमातून फायबरद्वारे ऐतिहासिक चित्रे रेखाटण्यात आली असून त्याची पाहणी गणेश भोसले यांनी केली आहे. (छाया - लहू दळवी)

नगर - शहराला ऐतिहासिक वारसा लाभला आहे. तो जोपासण्याचे काम आपल्या सर्वांना करायचे आहे. या माध्यमातून आजच्या युवा पिढीला इतिहासाची ओळख निर्माण होईल. इतिहास हा समाजाला दिशादर्शक व प्रेरणा देणारा आहे. नगर जिल्ह्यासह शहरात ऐतिहासिक स्थळे मोठ्या प्रमाणात असून त्याची माहिती नगरकरांना हवी यासाठी एकाच भिंतीवर फायबर द्वारे चित्र रेखाटण्यात आली आहे. ६ जुलै सायंकाळी आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते लोकार्पण सोहळा होणार असल्याची माहिती मनपा माजी उपमहापौर गणेश भोसले यांनी दिली

बुरुडगाव रोड आयटीआय गेट शेजारील भिंतीवर महापालिकेच्या माध्यमातून फायबरद्वारे ऐतिहासिक चित्रे रेखाटण्यात आली असून त्याची पाहणी गणेश भोसले यांनी केली आहे. यावेळी अभिजीत चिप्पा, राजू भुजबळ, गणेश गायकवाड, प्रशांत तांबे व नागरिक उपस्थित होते.

अहमदनगर मनपाच्या माध्यमातून बुरुडगाव रोडवर १०० फूट आरसीसी भिंत तयार करण्यात आली असून त्यावरती फायबरद्वारे ऐतिहासिक चित्रे रेखाटण्यात आली. यामध्ये भुईकोट किल्ला, हश्त बिहिश्त महाल, चाँदबिबी महाल, शाह शरीफ दर्गा, फराह बख्क्ष महाल, भातोडीचे नृसिंह मंदिर, अवतार मेहेर बाबांची समाधी, पैस खांब संत ज्ञानेश्वर महाराज, ह्युम मेमोरियल चर्च, अमृतेश्वर मंदिर, अहमदनगर रेल्वे स्टेशन, लोखंडी पुल, शहराचे ग्रामदैवत विशाल गणपती मंदिर, चौथे शिवाजी महाराज स्मारक, आनंद धाम, बागरोजा महाल आदि चित्रे रेखाटण्यात आली असल्याची माहिती गणेश भोसले यांनी दिली.



मांगीलाल दगडूलाल डागा यांच्या निवासस्थानी महाश्रमण प्रज्ञामहर्षी प्रवर्तक गुरुदेव श्री रमेशमुनीजी यांचे सुशिष्या उपप्रवर्तक संस्कार सूर्य संस्कार मंचाचे संस्थापक श्री सिद्धराज आदी ठाणा ३ नागापूर महामांगलिक देताना.

# मांगीलाल डागा यांच्या निवासस्थानी महामांगलिक सोहळा

नगर - नागापूर येथील मांगीलाल दगडूलाल डागा यांच्या निवासस्थानी महामांगलिक सोहळा झाला. सोहळ्यात स्वागत करताना मांगीलाल डागा म्हणाले, साधू संत येती घरा तोचि दिवाळी दसरा. गतवर्षी नागापूर येथे चातुर्मास सोहळ्याचे नियोजन उत्तम करून तो यशस्वी करण्याची सेवा केली. या सेवेतील आनंद शब्दातीत आहे. आम्ही सर्वजण साधू-संतांच्या दिव्य सान्निध्यात रहाण्याचा आनंद घेण्याची आतुरतेने वाट पहात असतोच. चातुर्मासात इच्छा पूर्ण होते ही गुरूदेवांचीच कृपा होय.

महाश्रमण प्रज्ञामहर्षि प्रवर्तक गुरुदेव श्री रमेश मुनिजी महाराज यांचे सुशिष्य उपप्रवर्तक संस्कार सूर्य संस्कार मंच संस्थापक श्री सिद्धार्थमुनी म.सा. सिद्धराज आदि ठाणा एवंम आधात्म योगिनी शासन दीपिका उपप्रवर्तनी श्री बसंत कवरजी महाराज यांची सुशिष्या सरलमना महासतीजी डॉ. सौम्याश्रीजी म. सा. ठाणा ३ नागापूर यांनी महामांगलिक दिली. महामांगलिक दिल्यानंतर ७ जुलै पासून सावेडी जैन स्थानक येथे होणाऱ्या चातुर्मासात उपस्थित रहावे असे आवाहन म.सा.यांनी केले.

# सेवाभारती यांच्या पुढाकारातून नगर जिल्ह्यात निर्मलवारी उपक्रम यशस्वी

नगर - आषाढी एकादशीच्या निमित्ताने श्री क्षेत्र पंढरपूरला जाणाऱ्या त्र्यंबकेश्वर येथील विश्वगुरु संत श्री निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळ्यासाठी निर्मलवारी हा उपक्रम आपल्या अ.नगर जिल्ह्यातील पालखीच्या मुक्कामाच्या ठिकाणी सेवाभारती यांच्या पुढाकारातून आणि अ.नगर जिल्हा प्रशासन, अ.नगर महानगरपालिका, कृषी उत्पन्न बाजार समिती, नगर, हमाल पंचायत यांच्या सहकार्याने राबविण्यात येते आहे.

२ जुलै रोजी नगर शहरातील मार्केट यार्ड येथे मुक्कामी थांबलेल्या पालखीतील वारकऱ्यांच्या सेवेसाठी २५० पोर्टेबल शौचालये बाजार समितीच्या आणि क्लेरा ब्रुस हायस्कुलच्या आवारात उभारण्यात आलेली आहेत. या शौचालयाच्या वापरासाठी आवश्यक सर्व गोष्टी सारा प्लास्ट यांनी महापालिका आणि बाजार समिती प्रशासनाच्या सहकार्याने उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. पालखीतील वारकऱ्यांना या शौचालयाचा वापर करण्यास विनंती करण्यासाठी सेवाभारती या संस्थेने जवळपास ७५ स्वयंसेवकांची फौज रात्री १२ ते सकाळी ६ यावेळेत उपलब्ध करुन दिली. त्यामुळे बाजार समितीमधील परिसर स्वच्छ राहिल्याने गाळेधारकांना दरवर्षी होणारा घाणीचा आणि रोगराई पसरण्याचा त्रास कमी होण्यास मदत झाली. ३ जुलै रोजीसुध्दा हा उपक्रम मार्केट यार्ड परिसरात तसेच पालखीच्या पुढील मुक्कामाच्या ठिकाणी राबविण्यात येणार असून या उपक्रमात सेवा करण्यास इच्छुक असलेल्यांनी सचिव उदय भणगे, मो. ९२२६७२४०९२, डॉ. कृष्णा देहाडराय, मो. ८८०५९ ८२०८१ यांचेशी संपर्क साधावा.

